RNI NO. MAHMAR/2020/84035

Sachin Sir's English Speaking
Its 100% guaranteed course
सबसे आसान तरीकेसे
अंग्रेजी बोलना
सिखानेके लियेही
हम जाने जाते है।
9028851719

# BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स
फिटर, पेंटर,
कारपेंटर,
प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर
वर संपर्क करावा.
संपर्क
मो. 8482839451



सोमवार, १० नोव्हेंबर २०२५ | वर्ष : ५ | अंक : २३२ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Monday,10 October 2025 | Year : 5 | Issue : 232 | Daily | Rate: Rs. 5/-

# समस्तीपूरमध्ये रस्त्याच्या कडेला आढळल्या VVPAT स्लिप्स

## निवडणूक आयोगाची कडक कारवाई, अधिकारी निलंबित

**पाटणा :** बिहारमधील समस्तीपूर जिल्ह्यातील ही घटना निवडणूक आयोगाच्या कडक शिष्टाचारांवर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित करते. रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात 'व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल (VVPAT)' स्लिप सापडल्यानंतर प्रशासनाने कारवाई केली.

तपासात हे 'मॉक पोल'म्हणजेच प्रायोगिक मतदान स्लिप असल्याचे उघड झाले, परंतु निष्काळजीपणामुळे निवडणूक आयोगाने सहाय्यक निवडणूक अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित केले आणि एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले. ही घटना समस्तीपूरच्या सराईरंजन विधानसभा मतदारसंघात घडली, जिथे एका महाविद्यालयाजवळ रस्त्याच्या कडेला व्हीव्हीपॅट स्लिप विखुरलेल्या आढळल्या. ही बातमी कळताच स्थानिक प्रशासन आणि निवडणूक आयोगाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले. स्थानिक रहिवाशांनी सकाळी काही मुलांना रस्त्याच्या कडेला स्लिप सापडल्याचे सांगितले आणि त्यांनी त्यांचे फोटो सोशल मीडियावर पोस्ट केले, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात जनक्षोभ निर्माण झाला. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयातून जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्राथमिक तपासणीत असे दिसून आले आहे की या स्लिप्स 'मॉक पोल' मधून



आल्या आहेत, म्हणजेच मतदान सुरू होण्यापूर्वी मशीन तपासणी दरम्यान त्या मिळाल्या होत्या. तथापि, त्या सुरक्षितपणे नष्ट करण्याची जबाबदारी स्थानिक अधिकाऱ्यांची होती, जी करण्यात आली नाही. निवडणूक आयोगाने ही चूक गंभीर मानली आणि सहाय्यक निवडणूक अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित केले आणि एफआयआर दाखल केला. जिल्हा दंडाधिकाऱ्यांना घटनास्थळी वैयक्तिकरित्या भेट देऊन सविस्तर चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले.

### दुसऱ्या टप्प्यातील मतदान आता 11 नोव्हेंबर रोजी 122 जागांसाठी होणार आहे.




**पटना :** बिहारमध्ये निवडणूक प्रचार थांबला आहे. दुसऱ्या टप्प्यातील मतदानाची तयारी जवळजवळ पूर्ण झाली आहे. आज प्रचाराच्या शेवटच्या दिवशी सर्व पक्षांनी पूर्ण ताकद लावली आहे. मतदानादरम्यान कोणताही अनियमितता होऊ नये यासाठी 4,00,000 हून अधिक सुरक्षा कर्मचारी तैनात केले जातील. दुसऱ्या टप्प्यात 20 जिल्ह्यांतील 122 विधानसभा जागांवर मतदान होणार आहे. त्यासाठी 45339 मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. त्यापैकी 4109 मतदान केंद्रे संवेदनशील घोषित करण्यात आली आहेत. यामध्ये 4003 मतदान केंद्रे अतिसंवेदनशील घोषित करण्यात आली आहेत. येथे 4 वाजेपर्यंत मतदान होईल.

# हरियाणाप्रमाणेच महाराष्ट्र, मध्य प्रदेशातही मतचोरी, आमच्याकडचे पुरावे ... : राहुल गांधी



**नवी दिल्ली :** लोकसभेचे विरोधी पक्षनेते यांनी पुन्हा एकदा मतचोरीचा आरोप केला आहे. हरियाणामध्ये जशी मतचोरी झाली आहे तशीच मतचोरी मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि छत्तीसगढ या ठिकाणीही झाली आहे असा आरोप राहुल गांधींनी केला आहे. मागील आठवड्यात पत्रकार परिषद घेऊन राहुल गांधींनी आरोपांच्या फैरी झाडल्या होत्या. त्यानंतर पुन्हा एकदा राहुल गांधी यांनी मतचोरीचा आरोप केला आहे. मी स्पष्टपणे सांगू शकतो की हरियाणाप्रमाणेच महाराष्ट्र, छत्तीसगढ, मध्य प्रदेश या ठिकाणीही मतांची चोरी झाली आहे. आमच्याकडे सगळे पुरावे आहेत. हळूहळू आम्ही ते पुरावे समोर आणू. तसेच निवडणूक आयोगाकडेही आम्ही दाद मागणार आहोत. लोकशाहीवर आणि संविधानावर हल्ला केला जातो आहे. हा हल्ला नरेंद्र मोदी, अमित शाह आणि ज्ञानेश कुमार करत आहेत. त्यामुळे भारतमातेचं अतोनात नुकसान होतं आहे. हरियाणा आणि महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका मागील वर्षी पार पडल्या. या निवडणुकांमध्ये भाजपाला घवघवीत यश मिळाले महाराष्ट्रात तर महायुतीला 232 जागा मिळाल्या. या सगळ्यानंतर राज्यात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले आणि अजित पवार तसंच एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री झाले. महायुतीला मिळालेल्या या प्रचंड यशावरच राहुल गांधींनी आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. याआधी ऑगस्ट महिन्यांतही राहुल गांधींनी याच प्रकारे आरोप केले होते. आता हरियाणा या ठिकाणी 25 लाख मतांची चोरी झाली असं म्हणत राहुल गांधींनी जोरदार टीका केली होती. तसंच ब्राझीलच्या महिलेने 10 बूथवरुन 22 वेळा मतदान केलं असाही खळबळजनक आरोप त्यांनी केला होता. तर भाजपाने आणि निवडणूक आयोगाने त्यांना उत्तर दिलं होतं. मात्र राहुल गांधींनी पुन्हा एकदा मतचोरीचा आरोप केला आहे. महाराष्ट्र, छत्तीसगढ आणि मध्य प्रदेशात मतचोरी झाल्याचे राहुल गांधी म्हणाले आहेत.

## महत्त्वाच्या बातम्या

### वडिलांच्या परवानाधारक पिस्तूलने वर्गमित्रावर गोळीबार

**नवी दिल्ली :** गुरुग्राममध्ये काल रात्री उशिरा एक धक्कादायक घटना घडली. दोन अल्पवयीन मुलांनी त्यांच्या वडिलांच्या परवानाधारक पिस्तूलने अकरावीच्या वर्गमित्रावर गोळीबार केल्याचा आरोप आहे. जखमी विद्यार्थ्याची प्रकृती गंभीर असल्याचे वृत्त आहे. उशिरा सेक्टर 48 मध्ये एका मुलाला गोळी लागल्याची तक्रार पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच सदर पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी पोहोचले. पोहोचताच पोलिसांना कळले की जखमी मुलाच्या कुटुंबाने त्याला उपचारासाठी मेदांता रुग्णालयात आधीच नेले आहे.

### ट्रम्प यांनी भारतात गुगल, इन्स्टा, फेसबुक वापरण्यावर बंदी आणली तर?

**नवी दिल्ली :** भारतीय टेक कंपनी झोहोचे सीईओ श्रीधर वेम्बू यांनी डिजिटिल सार्वभौमत्व आणि आत्मनिर्भरतेची गरज ही चर्चा पुन्हा एकदा सुरू केली आहे. अराताई हे इन्स्टंट मेसेजिंग ॲप तयार केल्यानंतर श्रीधर वेम्बू चर्चेत आहेत. प्रसिद्ध उद्योगपती आणि अब्जाधीश हर्ष गोयंका हे अधूनमधून एक्सवर कल्पक पोस्ट टाकण्यासाठी प्रसिद्ध आहेत. भारतीय तंत्रज्ञान, चालू घडामोडी, उद्योग यावर ते खुमासदार भाष्य करत असतात. आताही त्यांनी एक पोस्ट करत भारतीयांना एक कल्पना करण्यास सांगितले. ते म्हणाले, 'समजा ट्रम्प यांनी, गुगल इंस्टाग्राम, एक्स, फेसबुक आणि चॅटजीपीटी सारखे प्लॅटफॉर्म वापरण्यास आपल्यावर बंदी आणली. तर काय परिणाम होतील याचा आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे. आपल्याकडे प्लॅन बी काय आहे?

### सहल जीवावर बेतली; शिक्षकासह विद्यार्थ्याचा समुद्रात बुडून मृत्यू

**अकोला :** सहलीवर जाणे शिक्षकासह विद्यार्थ्याच्या जीवावर बेतले आहे. रायगड जिल्ह्यातील 'काशीद बीच' येथे अकोला शहरातील एका खासगी शिकवणी वर्गातील शिक्षक व विद्यार्थी सहलीसाठी गेले होते. त्यावेळी समुद्रात बुडून दोन जणांचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी सायंकाळी घडली. राम कुटे आणि आयुष रामटेके असे बुडून मृत्यू झालेल्या दोन जणांची नावे आहेत. अकोला शहरातील एका शिकवणी वर्गाचे 12 विद्यार्थी आणि तीन शिक्षक सहलीसाठी रायगड जिल्ह्यातील काशिद समुद्र किनाऱ्यावर गेले होते. त्यातील दोन विद्यार्थी आणि एक शिक्षक असे तीन जण पाण्यात बुडाले.

# देशात दहशतवादी हल्ल्याचा कट रचल्याचा आरोप : एटीएस

## गुजरातमध्ये तीन संशयितांना अटक




**अहमदाबाद :** गुजरातमध्ये दहशतवादी हल्ल्याचा कट रचल्याच्या आरोपाखाली तीन संशयितांना अटक करण्यात आली आहे. दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) शस्त्रास्त्रे पुरवत असताना तीन संशयित दहशतवाद्यांना अटक केली. देशात दहशतवादी हल्ल्याचा कट रचल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्यांची ओळख डॉ. अहमद मोहिउद्दीन सय्यद, मोहम्मद सुहेल पुत्रा आणि आझाद अशी झाली आहे. पोलिसांनी तिघांकडून शस्त्रे आणि दारूगोळा देखील जप्त केला आहे.सपाहा 7 अहमदाबाद, गुजरात 7 गुजरात एटीएसने अदलाज टोल प्लाझाजवळून डॉ. अहमद मोहिउद्दीन, आझाद सुलेमान शेख आणि मोहम्मद सुहेल सलीम खान यांना अटक केली. त्यांच्याकडून दोन ग्लॉक पिस्तूल, एक बेरेटा पिस्तूल, 30 जिवंत काडतुसे आणि 4 लिटर एरंडेल तेल जप्त करण्यात आले. पोलिसांच्या निवेदनात म्हटले आहे की, 'गुजरात एटीएसने अहमदाबादमधून तीन संशयितांना अटक केली आहे. ते गेल्या वर्षभरापासून गुजरात एटीएसच्या रडारवर होते. शस्त्रे पुरवताना तिघांनाही अटक करण्यात आली. ते देशाच्या विविध भागात दहशतवादी हल्ले करण्याची योजना आखत होते.'

# कायदेशीर सेवा ही एक चळवळ आहे ... : सरन्यायाधीश बी.आर. गवई



**इम्फाल :** भारताचे सरन्यायाधीश भूषण आर. गवई म्हणाले की 'न्याय हा काही मोजक्या लोकांचा विशेषाधिकार नाही, न्याय हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. न्यायाचा प्रकाश समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे आणि ते न्यायाधीश व वकिलांचे कर्तव्य आहे.' सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात कायदेशीर मदतीसंदर्भात राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. सरन्यायाधीशांच्या उपस्थितीत या परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सरन्यायाधीश म्हणाले, 'कायदेशीर सेवा ही एक चळवळ आहे आणि त्याचे परिणाम आकडेवारी आणि वार्षिक अहवालांमध्ये नव्हे तर दुर्लक्षित नागरिकांच्या आत्मविश्वासात व कृतज्ञतेत दिसून येतात.'बी.आर. गवई यांनी यावेळी त्यांच्या मणिपूर भेटीचा उल्लेख केला. ते म्हणाले, 'मणिपूरमधील एक घटना माझ्या मनात कायमची कोरली गेली आहे. काही महिन्यांपूर्वी, जेव्हा मी एनएएलएसएचा कार्यकारी अध्यक्ष होतो तेव्हा मी माझ्या सहकाऱ्यांसह मणिपूरला गेलो होतो. या भेटीवेळी मणिपूरमधील चुराचंदपूर येथील एका शिबिरात विस्थापितांना साहित्य वाटप करण्यासाठी गेलो होते. तेव्हा एक वृद्ध महिला पुढे आली, तिच्या डोळ्यांत अश्रू होते, ती हात जोडून मला म्हणाली, दादा, असाच राहा! सरन्यायाधीश म्हणाले, 'त्या महिलेचे वाक्य ऐकून एक गोष्ट माझ्या मनात कायमची अधोरेखित झाली. कायदेशीर चळवळीचे खरे प्रतिफळ आकडेवारी किंवा वार्षिक अहवालांमध्ये नसून एकेकाळी दुर्लक्षित वाटलेल्या नागरिकांच्या कृतज्ञेत आणि त्यांच्या आत्मविश्वासात आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास आपल्या यशाचे खरे मोजमाप संख्यांमध्ये नव्हे तर सामान्य माणसाच्या विश्वासात आहे. कोणीतरी, कुठेतरी, त्यांच्याबरोबर उभे राहण्यास तयार आहे आणि तो उभा राहील हा त्यांचा विश्वास आहे.

# निवृत्ती शालिग्राम जगझापे यांचे निधन



**नागपूर :** फुले - आंबेडकर विचारधारा चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते सेवा निवृत्त सिनिअर ऑडिट ऑफिसर (CAG, मुंबई) निवृत्ती शालिग्राम जगझापे यांचे दि. 9 नोव्हेंबर 2025 ला नागपूर येथे वयाच्या 84 वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.

निवृत्ती जगझापे यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थित शिक्षण घेत नोकरी प्राप्त केली. सामाजिक जाणीव असल्यामुळे सुरुवातपासूनच बामसेफ या सामाजिक संघटनेत त्यांनी सक्रिय सहभाग दिला.त्यानंतर बहुजन समाज पार्टी सुद्धा त्यांनी आपले योगदान दिले.यासाठी त्यांची पत्नी शकुंतला जगझापे यांनी साथ दिली. सामाजिक कार्य करत असताना. जगझापे यांनी मुलगा अभय जगझापे, मुली अस्मिता रामटेके,वर्षा गजभिये, प्रज्ञा सुरडकर, प्रणिता खोब्रागडे यांना उच्च शिक्षण दिले.ते आज केंद्र आणि राज्य सरकारी उच्च पदावर सेवा देत आहेत. त्यांच्या मृत्युमुळे सामाजिक चळवळीची आणि परिवाराची मोठी हानी झाली आहे. उद्या 10 नोव्हेंबरला (सोमवार) सकाळी 11:30 वाजता त्यांच्या राहत्या घरून (प्लॉट नं. 15 स्वावलंबी हाऊसिंग सोसायटी,स्वावलंबी नगर, नागपूर) प्रेत्यात्र निघणार आहे व 12 वाजता सहकार नगर घाट,सोनेगाव तलावाजवळ नागपूर येथे अंतिम संस्कार होणार आहेत.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अभ्यासक्रमात बदल

## आता चार वर्षात पदवी घेता येणार

**पुणे :** महाविद्यालयांमधून बाहेर पडणारा प्रत्येक तरुण अधिक कुशल आणि सक्षम बनवून 2047 पर्यंत विकसित भारताच्या प्रगतीत कसा सहभाग नोंदवू शकतो, यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे (एनईपी) सिंहावलोकन करणे काळाची गरज आहे, असे मत मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर.डी. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

सेंटर फॉर एज्युकेशनल डेव्हलपमेंट ॲडमिनीस्ट्रेशनतर्फे (सीईडीए) शनिवारी बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स (बीएमसीसी) येथील सायरस पूनावाला सभागृहात सायंकाळी आयोजित पुरस्कार सोहळ्याप्रसंगी डॉ. कुलकर्णी बोलत होते. सीईडीएचे अध्यक्ष प्रा. अनिरुद्ध देशपांडे, सचिव धनंजय कुलकर्णी, प्राचार्य डॉ. दीपक पौडेल उपस्थित होते. सीईडीएतर्फे देण्यात येणारा यंदाचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठातील वाणिज्य विभागाच्या प्रमुख डॉ. गारिकपती श्यामला यांना, तर कावेरी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाला उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



डॉ. कुलकर्णी म्हणाले, 'धोरणाची अंमलबजावणी करताना आलेल्या त्रुटी दूर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सुरुवातीला हे धोरण झेपेल का? असे वाटत होते. मात्र, आता हे धोरण सुलभ झाले आहे. लवकरच पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा होणार आहे, त्यावर काम सुरू आहे. फेब्रुवारी महिन्यापर्यंत याबाबत मार्गदर्शक तत्व जाहीर करण्यात येणार आहेत.' 'नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण तयार करतांना शिक्षणाची आवड असणाऱ्यांबरोबर अभ्यासक्रमात कुशल आणि सक्षम बनविण्याच्या दृष्टीने बारकाईने विचार करण्यात आला आहे. त्यासाठी हे धोरण अस्तित्वात आणण्यासाठी प्राथमिक स्तरावर अनेक प्रयोग राबवले गेले. काही प्रयोग यशस्वी झाले, तर काही प्रयत्नांची पूनर्रचना करण्यात आली. विद्यार्थ्यांना रुची असलेल्या विषयांचा समावेश करून छोटे-छोटे अभ्यासक्रम आखण्यात आले आहेत,' असेही डॉ. कुलकर्णी म्हणाले.'एकाच वेळी अनेक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊन शिक्षण घेऊन बाहेर पडणे, या धोरणातील एका तरतुदीबाबत महाविद्यालयांकडून सकारात्मकता दर्शविण्यात येत नव्हती. मात्र, आता महाविद्यालयांना हे धोरण पटू लागले आहे. कला-वाणिज्य-विज्ञान याबरोबर अभियांत्रिकी शिक्षण देण्यास महाविद्यालये अनुकूल झाली आहेत. उद्योग, व्यवसायांमध्ये कुशल मनुष्यबळाची आवश्यता असल्याचे भविष्यकालीन आवश्यता लक्षात ठेवून प्रारूप विकसित करण्यासाठी महाविद्यालयांनी गरजेचे आहे असेही डॉ. कुलकर्णी म्हणाले

# वंदे भारत एक्सप्रेसच्या उद्घाटनावेळी विद्यार्थ्यांनी गायले RSS गीत



**केरळ :** वंदे भारत एक्सप्रेसच्या उद्घाटनावेळी शालेय विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (RSS) गीत गायल्यानंतर, केरळ सरकारने या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले आहेत. शिक्षणमंत्री व्ही. शिवनकुट्टी यांनी लोकशिक्षण संचालकांना (RSS) तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. संबंधित कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या निवेदनात म्हणण्यात आले आहे की, ही घटना सरकार अत्यंत गंभीरतेने घेत आहे, असे शिवनकुट्टी यांनी म्हटले आहे. शिवनकुट्टी म्हणाले, 'शासकीय कार्यक्रमांमध्ये मुलांना राजकारणात ओढणे आणि विशिष्ट गटाच्या सांप्रदायिक अजेंड्याला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांचा वापर करणे, हे संविधानिक तत्त्वांचे उल्लंघन आहे.' तसेच, अहवालाच्या निष्कर्षावरून पुढील योग्य ती कारवाई केली जाईल. तसेच देशातील धर्मनिरपेक्ष आणि राष्ट्रीय मूल्यांचे रक्षण करणे ही सरकारची जबाबदारी आहे, अशेही त्यांनी म्हटले आहे.

## पुणे शहरातील कोरेगाव पार्क येथील 1800 कोटी रुपयांची जमीन केवळ 300 कोटी रुपयांमध्ये खरेदी केल्याचा आरोप विरोधकांनी केला होता

**पुणे :** पुण्यातील कोरेगाव पार्क येथील 40 एकर जमिनीच्या खरेदी प्रकरणावरून राज्यात दोन दिवसांपूर्वी निर्माण झालेले वादळ काही अंशी आता शांत झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणी महसूल विभागाच्या अतिरिक्त सचिवांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली आहे. तसेच समितीला अहवाल सादर करण्यासाठी 30 दिवसांचा कालावधी दिला. त्यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार याप्रकरणात हिरीरीने आपल्या मुलाची बाजू मांडताना दिसत आहेत. आज बारामतीमध्ये बोलत असताना त्यांनी पुन्हा एकदा मुलाची बाजू सावरून धरली.

पुणे शहरातील कोरेगाव पार्क येथील 1800 कोटी रुपयांची जमीन केवळ 300 कोटी रुपयांमध्ये खरेदी केल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. एका वृत्तवाहिनीने ही बातमी पहिल्यांदा बाहेर आणल्यानंतर त्यावर मोठा गजहब उडाला. पहिल्या दिवशी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, असा काही व्यवहार झाला, याची त्यांना कल्पना नव्हती. तसेच दोन-चार महिन्यांपूर्वी त्यांनी काही चुकीचे करू नका, असे सांगितल्याचे म्हटले. मात्र आता या विधानांवरही त्यांनी स्पष्टीकरण दिले आहे.'2009 रोजीदेखील असेच 70 हजार कोटींचा आरोप झाला. त्याला आता 15 वर्ष झाली तरी काही पुरावे कुणी देऊ शकले नाही. यातून आमची बदनामी होते. तरी माध्यमांतून अनेक प्रवक्ते आरोप करत असतात. शेवटी

# पुण्यातील महार वतनाच्या जमीन खरेदी प्रकरणात पार्थ पवारांवर आरोप ?



चुकीचे कुणी काही केले आणि त्याच्यावर आरोप झाले तर आम्ही समजू शकतो. पण पुरावे नसतानाही सकाळपासून रात्रीपर्यंत आरोप करणे चुकीचे आहे', अशी भूमिका अजित पवार यांनी मांडली.

यानंतर अजित पवार यांनी बारामतीमधील जमीन गैरव्यवहाराबाबत जे आरोप झाले, त्यावरही स्पष्टीकरण दिले. 1994 साली कृषी उत्पन बाजार समितीसाठी 5 एकर जमीन खरेदी प्रस्ताव दिला होता. ग्रामपंचायतीने त्यासंबंधी ठराव केला. त्यानंतर 2003 साली ही जमीन संघाच्या ताब्यात आली. तिथे बारामतीच्या विकासाच्या दृष्टीने काम करण्यात आले आहे. निवडणुका जवळ आल्या की, आम्हाला लक्ष्य करण्यासाठी अशी प्रकरणे बाहेर काढली जातात.

### एक रुपयाचा व्यवहार न करता कागद : अजित पवार

एक रुपयाचा व्यवहार न करता नुसते आकडे लिहून कसा काय कागद तयार होऊ शकतो ? हे आजपर्यंत मला कळलेलं नाही. मी पण आश्चर्यचकीत झालो. ज्या रजिस्टर ऑफिसच्या व्यक्तीने ही नोंदणी केली, त्याने अशी नोंदणी कशामुळे केली ? काय असे घडले की त्याने चुकीचे काम केले ? असे प्रश्न उपस्थित करत याविषयीची वस्तुस्थिती आपल्याला एका महिन्यात कळेल असे दादांनी सांगितले. त्यामुळे याप्रकरणात प्रशासकीय यंत्रणेकडे त्यांनी थेट बोट दाखवले आहे.

तुम्ही तुमच्यापुरते बोला. तुम्ही 5000 कोटींचा भ्रष्टाचार केला आहे. त्याच्याबद्दल तुम्ही तोंड उघडत नाहीत. पण नको त्या विषयात तोंड उघडत असाल तर माध्यमांसमोर आपण समोरसमोर येऊन चर्चा करू. जमीन खरेदी प्रकणावर बोलत असताना रोहित पवार म्हणाले, सत्तेत असो किंवा सत्तेच्या बाहेर असो कुणीही जर बेकायदेशीर काम करण्याचा प्रयत्न करत असेल तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. खरे आणि खोटे काय ? हेही जनतेसमोर आले पाहिजे. पण या व्यवहारामागची साखळी समोर आली पाहिजे. कारण अधिकारी काही विशिष्ट लोकांचीच कामे करत असतात, हे का होते ? याचीही माहिती समोर आली पाहिजे.

\- रोहित पवार

दि गोंदिया डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड गोंदिया (महा.)
मुख्य कार्यालय
गायत्री मंदीर,
तिरोडा रोड, गोंदिया
फोन नं. 8767801914
फॅक्स (07182) 250485
समृद्धीसाठी सहकार
दिपावलीच्या हार्दीक शुभेच्छा
जिल्ह्यात 31 शाखांमधुन अविरत सेवा, तत्पर सेवेचा वारसा लाभलेली गोंदिया जिल्ह्यातील शेतक-यांची, ठेवीदारांची व सभसदांची बँक
■ ठेवीदारांच्या ठेवीवर आकर्षक व्याजदर. ■ बँकेतील ठेवीदारांना 5 लाख पर्यंत विमा संरक्षण. ■ मुदती ठेवीवर कर्जाची सोय उपलब्ध. ■ शेतक-यांना शेती विषयक गरजानुसार सर्व प्रकारचा कर्ज पुरवठा. ■ बचत गटांना कर्ज पुरवठा. ■ गृहकर्ज पुरवठा. ■ वाहन कर्ज योजना ■ व्यवसायकरिता मुक्त प्रत्याय कर्ज मर्यादा योजना. ■ मालमत्ता गहाण योजना. ■ वैयक्तिक कर्ज रु.10 लक्ष पर्यंत. ■ पगारदार कमर्चार्यांना मुक्त प्रत्याय कर्ज मर्यादा
उपलब्ध सुविधा - 1. रुपये, डेबीट एटीएम कार्ड द्वारे कुठुनही पैसे काढण्याची सोय 2. आरटीजीएस/एनइएफटी सुविधा 3. एसएमएस अलर्ट 4. ऐनी ब्रांच बँकिंग 5. एवीपीएस/एनएसीएच द्वारे डायरेक्ट बेनीफिट सुविधा 6. 19 शाखेमध्ये एटीएम सुविधा..
श्री राजेन्द्र जैन - अध्यक्ष | श्री भैरसिंह नागपुरे - उपाध्यक्ष | श्री अजय हलमारे - सचिव
संचालकगण..

“ सेवाभाव हा लोकांना जिंकण्याचा एक यशस्वी मार्ग आहे. ”



बहुजन सौरभ

# संपादकीय

## एकीचा मार्गच यशाचे सूत्र

झो लोकशाही म्हणजे मतदारांवरील विश्वास आणि लोकांनी आपल्या मतांच्या शक्तीने समाजाची दिशा ठरवणे. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू होत असताना पुन्हा एकदा राजकारण तापले आहे. गेल्या काही वर्षांत झालेल्या राजकीय उलथापालथीमुळे या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या राजकीय वाटचालीत जातीनिष्ठतेपासून दूर राहण्याचा संदेश दिला होता. त्यांनी स्पष्ट सांगितले होते की, मी महार जातीत जन्मलो असलो, तरी महार जात टिकावी म्हणून मी कधीच प्रयत्न करीत नाही. त्यांच्या या विचारसरणीतून प्रत्येक मतदार आणि नेता आजही प्रेरणा घेऊ शकतो. आज राज्यात स्थानिक निवडणुकीचा बिगुल वाजला असून सर्व पक्षांनी आपली रणनीती आखायला सुरुवात केली आहे. सत्ताधारी, विरोधक, स्वबळावर उतरणारे गट, आणि नवे राजकीय प्रयोग – अशा सर्व रंगांचा हा राजकीय सोहळा आहे. मात्र, या साऱ्या गोंधळात एक गोष्ट स्पष्ट दिसते की एकीचा अभाव हेच बहुजन, दलित आणि रिपब्लिकन विचारधारेच्या पक्षांचे सर्वात मोठे दुर्बलतास्थान आहे. बहुजन समाज पक्ष, वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन पक्षाचे विविध गट, बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पक्ष, आनंदराज आंबेडकर यांची रिपब्लिकन सेना किंवा प्रा. जोगेंद्र कवाडे यांचा पीपल्स रिपब्लिकन पक्ष–सगळ्यांनी आपल्या मार्गाने लढण्याची तयारी दाखवली आहे. पण संघटित नेतृत्व आणि एकसंध धोरण यांचा अभाव राजकीय सामर्थ्य कमी करत आहे. रिपब्लिकन विचारांचा मोठा मतदारवर्ग असूनही तो एका छताखाली येत नाही, हे चिंतेचे कारण आहे. राजकारणात दबावगट निर्माण करण्याची ताकद एकतेतूनच निर्माण होते. भारताची लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित नाही; ती प्रत्येक नागरिकाच्या सहभागाने आणि जबाबदारीने जिवंत राहते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या लोकशाहीच्या सर्वात खालच्या पातळीवरील ताकद दर्शवतात. गाव, शहर, तालुका या पातळीवर होणाऱ्या या निवडणुका नागरिकांना सत्तेच्या केंद्रात थेट सहभाग घेण्याची संधी देतात. त्यामुळे या निवडणुका ही केवळ राजकीय परीक्षा नसून लोकशाहीच्या आरशात आपला चेहरा पाहण्याची वेळ असते. आंबेडकरांचा संदेश आणि आजची वास्तवता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या आयुष्यभर लोकशाही, समता, आणि सामाजिक न्यायासाठी लढा दिला. त्यांनी 2 जुलै 1939 रोजी मुंबईत स्पष्टपणे सांगितले होते, मी सार्वजनिक कामाला आरंभ केल्यापासून जातीनिष्ठ मनोभूमिका कधीच ठेवली नाही. हा संदेश आजच्या राजकीय गोंधळात अधिक प्रासंगिक ठरतो. कारण आजचे राजकारण प्रामुख्याने जात, धर्म, आणि संख्येच्या राजकारणावर आधारित झाले आहे. आंबेडकरांचा विचार होता की समाजाची प्रगती ही संघटित प्रयत्नांमधून होते. पण सध्याच्या राजकीय परिस्थितीत दलित, बहुजन आणि वंचित वर्गाचे पक्ष अनेक गटांत विभागले गेले आहेत. एकेकाळी जे विचार एक झेंड्याखाली होते, ते आज वेगवेगळ्या दिशांना विखुरलेले दिसतात. बदललेले राजकीय समीकरण महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य निवडणुकांकडे पाहिल्यास राजकीय समीकरण पुन्हा बदलताना दिसते. भारतीय जनता पक्ष, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांसारखे प्रमुख पक्ष विविध गटांत विभागले गेले आहेत. एका बाजूला हे मोठे पक्ष आपापल्या संघटनशक्तीच्या जोरावर मैदानात उतरले आहेत, तर दुसऱ्या बाजूला बहुजन, वंचित आणि रिपब्लिकन गट स्वतंत्रपणे किंवा छोट्या युतींसह निवडणूक लढवत आहेत. आनंदराज आंबेडकर यांची रिपब्लिकन सेना, प्रा. जोगेंद्र कवाडे यांचा पीपल्स रिपब्लिकन पक्ष, सुरेखा कुंभारे यांचा बहुजन रिपब्लिकन एकता मंच, रामदास आठवले यांचा रिपब्लिकन पक्ष, बहुजन समाज पक्ष (बीएसपी), आणि वंचित बहुजन आघाडी (वीबीए) – या सगळ्या संघटना एकाच विचारधारेतून जन्मलेल्या असल्या तरी एकत्र येण्याऐवजी वेगवेगळ्या मार्गांनी लढत आहेत. यामुळे त्यांचे मतविभाजन राजकीयदृष्ट्या मोठे नुकसान ठरू शकते. एकतेचा अभाव हा प्रमुख अडथळा बहुजन आणि रिपब्लिकन पक्षांच्या पराभवाचे प्रमुख कारण त्यांची अंतर्गत विखुरण आहे. विचार एक असला तरी नेतृत्वातील अहंकार, सत्तेचा मोह आणि स्वार्थ यामुळे या पक्षांची एकजूट होत नाही. रिपब्लिकन विचारसरणीचा मोठा मतदारवर्ग आजही अस्तित्वात आहे, परंतु त्याला एकत्र करणारे प्रभावी नेतृत्व नाही. मतदारांमध्ये असलेली विचारनिष्ठा अपार आहे, पण संघटनात्मक ऊर्जा कमी आहे.जर बीएसपी, वंचित आणि रिपब्लिकन गटांनी एका मंचावर येऊन एक उमेदवार, एक विचार, एक ध्येय या धोरणावर निवडणुकीला सामोरे गेले, तर महाराष्ट्राचे राजकीय स्वरूप बदलू शकते. आंबेडकर विचारसरणीची ताकद पुन्हा एकदा लोकशाहीत दिसू शकेल. मतदारांच्या जागृतीची गरज आज मतदार अधिक सजग आणि माहितीपूर्ण आहे. जात किंवा धर्माच्या पलीकडे जाऊन तो विकास, रोजगार, शेती, आणि स्थानिक प्रश्नांवर आधारित मतदान करू लागला आहे. गावकडील राजकारणात शेतकरी, कामगार, आणि तरुण यांच्या समस्या मध्यवर्ती ठरल्या आहेत. शेतीचे नुकसान, विजेची कमतरता, बेरोजगारी, घरकुल, आणि ग्रामविकास यांसारख्या मुद्द्यांवर लोक नेत्यांना प्रश्न विचारू लागले आहेत.या पार्श्वभूमीवर सर्व राजकीय पक्षांना आपली शैली बदलावी लागेल. आता जनतेला फक्त आश्वासन नव्हे तर ठोस कृती हवी आहे. लोकशाही टिकवायची असेल, तर ती व्यवहारात उतरवणारे शासन हवे. भविष्यासाठीचा मार्ग आगामी काळात जर बहुजन आघाडी, रिपब्लिकन गट, आणि बीएसपी यांनी एकत्र येऊन सामूहिक नेतृत्व निर्माण केले, तर त्याचा परिणाम फक्त स्थानिकच नव्हे तर राज्य-स्तरीय राजकारणावरही मोठा होईल. असा दबावगट निर्माण झाला तर तो सत्तेत असो वा विरोधात, लोकशाहीच्या आरोग्यासाठी हितकारक ठरेल. शेवटी, निवडणूक म्हणजे सत्ता मिळवण्याचे साधन नव्हे, तर समाजाचे न्याय्य प्रतिनिधित्व मिळवण्याचे साधन आहे. डॉ. आंबेडकरांनी दाखवलेला समता आणि संघटनाचा मार्ग पुन्हा एकदा स्वीकारणे हेच या काळाचे खरे राजकीय उत्तर ठरेल. ■ ■

# आरएसएस मुर्दाबाद !

**जयभीम!**
**दि. 22 ऑक्टोबर 2025 रोजी माता रमाबाई आंबेडकर नगर, घाटकोपर येथे आरएसएस विरोधातील ‘मुर्दाबाद’ घोषणा दिल्या प्रकरणी पंतनगर पोलिसांनी (स्वतःहून) घोषणा देणाऱ्या कार्यकर्त्यांवर गुन्हा नोंद केल्याचे काय प्रकरण आहे त्याची थोडक्यात माहिती -**
**दि. 22 ऑक्टोबर रोजी माता रमाबाई आंबेडकर नगर, घाटकोपर समोरून जाणाऱ्या संविधान द्रोही, अनधिकृत संघटना आरएसएसच्या विरोधात ‘आरएसएस मुर्दाबाद’ चे नारे दिले गेले.**




स दर नारेबाजी दोनच मिनिटांत आटोपली. या ‘आरएसएस मुर्दाबाद’ नाऱ्यांचा व्हिडिओ तुफान वायरल झाला व आरएसएसचे पित्त खवळले. त्याने पोलिसांमार्फत FIR नोंदवत सदर नारे देणाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केलाय.

**प्रकरण थोडक्यात :** 1) दि. 15 ऑक्टोबर रोजी आरएसएसने पंतनगर पोलीसांना एक पत्र देवून, आरएसएस ‘दसरा पथ संचलन निमित्त’, 22 ऑक्टोबर रोजी माता रमाबाई आंबेडकर नगरातून 75-80 तरुणांचे सदंड, सहघोष संचलन करणार असल्याची माहिती पोलिसांना दिली.

2) वस्तीतील लोकांना याची कुणकुण लागताच त्यांनी व वस्तीतील इत्तर अनेक संघटनांनी अशा पथ संचलनाला विरोध करणारी निवेदने पंतनगर पोलिसांना धाडली व पोलीसांच्या सोबत बैठका घेतल्या.

3) निवेदने व कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष भेटी याला अनुसरून, पोलिसांनी पथसंचलन वस्तीमधून होणार नाही व ते प्रवेशद्वारा समोरील फ्लाय-ओव्हर वरून परस्पर जाईल असे सांगत कार्यकर्त्यांची बोळवण केली.

4) प्रत्यक्ष हे संचलन फ्लाय-ओव्हर वरून न नेता पोलिसांनी वस्तीच्या प्रवेशद्वार लगत असलेल्या हायवे वरूनच नेले.

5) या पथ संचलनात आरएसएसने पोलिसांना दिलेल्या पत्राप्रमाणे 75-80 तरुण नव्हते तर जवळपास 150-175 (FIR मधील पोलिसांनी नमूद केलेला आकडा) दंडुकेधारी तरुण होते.

6) हे संचलन वस्तीच्या प्रवेशद्वारासमोर येताच (सकाळी 08.45 सुमारास), तिथे डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्याजवळ आधीच सुरू असलेल्या संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन या नियोजित कार्यक्रमात सामिल काही आंबेडकरी तरुणांनी हायवे कडे पुढे होवून आरएसएस मुर्दाबादच्या घोषणा दिल्या.

7) सायंकाळी वस्तीतील तरुणांनी पंतनगर पोलीस स्टेशनला जावून, कायदा व सुव्यवस्थेची बुज राखली (?) म्हणून पोलिसांचे आभार ही मानले. शाल देवून सत्कार घेतला.

8) वस्तीतील ही मंडळी माघारी घरी पोहोचली असतील नसतील, तेव्हढ्यात पोलिसांनी सकाळी घडलेल्या ‘आरएसए मुर्दाबाद’ प्रकरणी, जमावबंदीचा आदेश मोडला या कलमाखाली 19-20 जणांवर गुन्हा नोंदवला (FIR क्रमांक 1140, 22 ऑक्टोबर, सायंकाळी 07.12 वाजता).

अधिक माहिती :

1) विजयादशमी 2 ऑक्टोबर रोजी उरकली होती. त्यामुळे ‘विजयादशमी निमित्ते’ 20 दिवसांनी म्हणजेच 22 ऑक्टोबरला पथसंचलन करण्याचं आरएसएसला काहीच कारण नव्हते.

2) माता रमाबाई आंबेडकर नगर वसाहतीच्या कित्येक किलोमीटर परिसरात आरएसएसची कुठलीच शाखा नसतांनाही, इथेच संचलन करण्याचा घाट आरएसएसने मुद्दाम घातला व त्याला पूर्णत्वास नेण्यासाठी पोलिसांनी त्यांना प्रचंड बंदोबस्तात संरक्षण दिले.

3) माता रमाबाई आंबेडकर नगर वस्तीच्या आत उभे राहून आरएसएस मुर्दाबादच्या घोषणा देणारे जेमतेम वीसेक आंबेडकरी तरुण हे ‘जमावबंदीचा आदेश मोडला’ म्हणून गुन्हेगार ठरतात तर अगदी त्याच वेळी ईस्टर्न एक्सप्रेस हायवे वरील वाहतूक अडवून त्यावरून मिजासखोरीत संचलन करणारे 175 दंडुकेधारी तरुण मात्र जमावबंदी आदेश मोडल्याचे गुन्हेगार ठरत नाहीत.

4) मिळालेल्या माहितीनुसार सदर पथ संचलनासाठी आरएसएसने, पंतनगर पोलीस व/वा वाहतूक नियंत्रण शाखेची कुठलीच परवानगी घेतलेली नव्हती.

आरएसएसचा डाव :-

1) माता रमाबाई आंबेडकर नगर ही वस्ती अती-संवेदनशील अशी आहे हे सर्वज्ञात आहे. 1997 साली पुतळा विटंबना प्रकरणात या वस्तीत हरामखोर जात्यंध फौजदार मनोहर कदम ने बेछूट, अंदाधुंद गोळीबाराचे आदेश देत 10 लोकांना जागेवरच मारून टाकले होते तर अनेकांना जखमी केले होते. जखमींपैकी एकजण

मिलिंद भवार
मो.9833830029

हात निकामी झाला म्हणून काम मिळेना या अवस्थेत दोन वर्षांने उपासमारीने मृत्यू पावला होता. हा खुनी इतिहास सरकार-दरबारी सर्वांना माहीत असतांनाही आरएसएसने जाणीवपूर्वक माता रमाबाई आंबेडकर नगर मधील आंबेडकरी जनतेला डिवचण्यासाठी सदर पथ संचलनाचे नियोजन केले होते हे अगदी उघड सत्य आहे.

2) माता रमाबाई नगराचे भल्यामोठ्या प्रमाणात झालेले भगवेकरण, धर्मांध शक्तींची या वस्तीत खोलवर रुजलेली पाळेमुळे, येथील वाया गेलेल्या महार जनावरांनी स्वखुशीने गळ्यात अडकवून घेतलेले भाजपा/आरएसएसचे ओंडके, वस्तीतील तथाकथित समंजस दलितांनी या सर्वांकडे केलेली सोयीस्कर डोळेझाक यातून आरएसएसची एव्हढी हिंमत वाढलीय हे नाकारता येणे शक्य नाही.

3) एकेकाळी आंबेडकरी चळवळीचे बालेकिल्ले म्हणून नावाजलेल्या आपल्या वस्त्या, अशाच प्रकारे काही महार जनावरांना पुढे करून, आरएसएस पोखरून काढत आहे.

4) आंबेडकरी वस्त्यांचे कंबरडे मोडले की शहरी आंबेडकरी मध्यम वर्ग आपसूक गळून पडेल हे आरएसएसला पुरते ठावूक असल्यामुळे त्यांनी आपल्या वस्त्या काबीज करण्याचे षडयंत्र रचलेय, जे बहुतांशी सफल होतांना दिसत आहे.

5) निरंकुश सत्ता हातात आल्यामुळे आरएसएसच्या छपरीगिरीत भरमसाठ वाढ झालेली दिसत आहे.

**काय करावे लागेल :**

ताबडतोब - माता रमाबाईनगरात आरएसएसने दाखवलेली दंडेली व पोलिसांची दडपशाही विरोधात विविध आंबेडकरी संघटनांनी पोलिस प्रशासनाला निवेदने आदी देवून आपापल्या परीने आवाज उठवला पाहिजे.

निरंतरपणे - कोणाचीही भीडभाड न बाळगता, वस्तीपातळीवर जलसे, कवी संमेलने, चर्चासत्र, परिषदा, जाहिर सभा आदी कार्यक्रम आयोजित करत राहत, डॉ. बाबासाहेबांच्या हयातीत त्यांचे पुतळे जाळणाऱ्या आरएसएसच्या मनुविकृत, संविधानद्रोही, धर्मांध प्रवृत्तीची खुलेआम पोलखोल करत, रमाबाई नगरातील मोजक्याच का होईना पण जांबाज भीमसैनिकांनी दाखवलेल्या आक्रोशाला, बेंबीच्या देठापासून साथ देत आवाज बुलंद करावा लागेल. ‘आरएसएस मुर्दाबाद ... मुर्दाबाद ... मुर्दाबाद..!’ ■ ■

# उदारमतवादाचा आश्वासक चेहरा ममदानी

**अमेरिकेची आर्थिक राजधानी न्यूयॉर्कचे नवे महापौर म्हणून झोहरान ममदानी यांची झालेली निवड उदारमतवादी आणि समाजवादी, कल्याणकारी राज्यव्यवस्था विचारांवर निष्ठा असणाऱ्यांसाठी आश्वासक आहे. न्यूयॉर्क महापौर पदाचा मुद्दा अमेरिकी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी प्रतिष्ठेचा केला होता. त्यांच्या मुस्लिम असण्यावरून टीका केली होती. त्यांना पराभूत करण्यासाठी ट्रम्प यांनी उपस्थित केलेले मुद्दे त्यांचा धर्म, समाजवादी विचार, कम्युनिस्ट धार्जिणे असल्याची केलेली टिपणी, हे सर्व मतदारांनी नाकारून उदारमतवादावर शिक्कामोर्तब केले.**




प्र चार काळात त्यांनी लोकांच्या मूलभूत समस्यांवर लक्ष केंद्रित करून समन्वयातून उत्तरे शोधण्याचे केलेले आवाहन मतदारांना आकर्षित करणारे ठरले. प्रामुख्याने निवारा आणि दळणवळण यावर त्यांनी प्रचारात जोर देऊन महागाईत होरपळणाऱ्यांसमोर आश्वासक भूमिका मांडली. एक लाख प्रचारकांनी त्यांची मोहीम घराघरापर्यंत राबवून ज्यू, मुस्लिम, हिंदू आणि तिसऱ्या जगातील देशांच्या स्थायिक मतदारांना मतदान करण्यास प्रवृत्त केल्याने भरघोस मतदान झाले.

झोहरान हे भारतीय वंशाचे आहेत. झोहरान ममदानी यांनी आपला धर्म लपविला नाही, तर जाहीरपणे त्याचा उल्लेख करून मी समाजवादी विचारधारेचा असल्याचे अधोरेखित केले. ही इस्लाम धर्मियांना एका चष्म्यातून बघणाऱ्यांना चपराक होती. मागच्या शंभर वर्षाच्या काळातील ते न्यूयॉर्कचे सर्वात तरुण महापौर आहेत. आई सिने दिग्दर्शक तर वडील प्राध्यापक. त्यांच्या प्रचारात कल्पकता होती. त्यांनी आशियायी नागरिकांशी बंगाली, हिंदी, उर्दू भाषेतून संवाद साधला तर इतर देशातील मतदारांशी स्पॅनिश, मेक्सिकन आणि इंग्रजी भाषेतून संवाद साधला.



अनिरुद्ध कांबळे
मो.9922959770

आशियायी मतदारांना आकर्षित करण्यासाठी हिंदी चित्रपटातील संवाद आणि गीतांचा आधार घेतला. त्यांच्या विजयी भाषणात ‘धूम मचाले...’ या गीताचे शब्द कानी पडत होते. या निवडणुकी आधीही ते चर्चेत आले ते इजराइलने पॅलेस्टिनच्या नागरिकांचा जो नरसंहार केला होता त्यावरील टीकेमुळे. त्यांनी उघडपणे प्रधानमंत्री नेतान्याहू यांच्यावर टीका केली. आश्चर्य हे की इजराईलच्या न्यूयॉर्क स्थित नागरिकांनी त्यांना मतदान करून त्यांच्या भूमिकेचे एकप्रकारे समर्थन केले. लोकशाही व्यवस्था भांडवलदारांच्या विळख्यात बंदिस्त होत असतांना त्यांनी समाजवादी, कल्याणकारी विचारांवर वाटचाल करण्याचे आश्वासन देऊन उजव्या विचारसरणीच्या नेतृत्वाला शह दिला हे विशेष आहे. अश्या प्रकारे आर्थिक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्यांवर केंद्रित होऊन मतदारांनी मतदान केले तर जातीय, धार्मिक धृवीकरण याचा आधार घेऊन निवडणुका लढणाऱ्या नेत्यांची नक्की कोंडी होणार आहे.

निवडणूक जिंकल्यानंतर केलेल्या भाषणात पं.नेहरू यांचे स्मरण करून स्वातंत्र्यानंतर केलेल्या त्यांच्या भाषणातील शब्द ‘जुन्यातून नव्यात प्रवेश करीत आहोत.’ वापरून नेहरू जागतिक पटलावर निधनाच्या साठ वर्षानंतरही तेवढेच महत्वाचे आहेत हे अधोरेखित केले. देशांतर्गत आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाणारे नेहरू उदारमतवाद्यांच्या ह्रदयात कायम स्थान ठेवून आहेत. हे अंधभक्तांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. जगात उजव्या विचारसरणीचे, भांडवलशाही प्रस्थापित करण्यासाठी झटणारे नेतृत्व सर्वत्र उभे ठाकले असताना उदारमतवादाचा आश्वासक चेहरा झोहरान ममदानी उदयास येणे लोकशाही मूल्ये, समाजवादी विचारकांसाठी सुखद अनुभुती आहे. ■ ■

# वाचकांचे विचारपिठ

## इंजि. नरेंद्र ताकसांडे यांच्या दीक्षाभूमीचा आराखडा जागतिक स्तरीय, ऐतिहासिक, सांस्कृतिक व नाविन्यपूर्ण या लेखावर अभिप्राय

1) **प्रा. घनश्याम धाबर्डे :** आपल्या सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय! आपण सर्वांगीण दृष्टीने दीक्षाभूमीचे विकासासाठी नाविन्यपूर्ण विचार मांडले. ते मनाला भावनारे असुन त्याचे लोक नक्कीच स्वागत करतील

2) **प्रा. राम घोडेस्वार :** Very technically and visionary suggesstions ! ...

3) **के. पी. वासनिक दिल्ली :** दीक्षाभूमीवर युवा व उपासक नित्य येत रहावे याकरिता आपण सुचविलेले ज्ञान केंद्र, बुद्धिस्ट स्टडीज, आंबेडकर थॉटस व पाली भाषेची केंद्रे, धम्म सभागृह व आंतरराष्ट्रीय बौद्ध परिषद व संम्मेलन यासाठी व्यवस्था, ही धम्म मजबूत करण्यास अत्यंत आवश्यक आहे.

4) **नरेश मेश्राम भंडारा :** आपण मोठे काम करीत आहात. ऐतिहासिक काम होईल.

5) **गौरव मेश्राम वर्धा :** दीक्षाभूमीला जागतिक स्तरावर नेण्याचा आपला विचार अत्यंत कौतुकास्पद आहे. हे पवित्र ऐतिहासिक स्थळ ज्ञान आणि संस्कृतीचे केंद्र व्हावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा वारसा चिरकाल टिकवण्याचे हे एक राष्ट्रीय कर्तव्य आहे.

6) **ॲड. जांभुळकर :** लेखक सिव्हिल इंजिनियर असुन त्यांचे दीक्षाभूमीचा संकल्पित विकास आराखड्यात डॉ. बाबासाहेब व बुद्ध यांचे विचाराचे प्रतिबंब पदोपदी दिसते. संकल्पित कामे दीक्षाभूमीचे पावित्र्य जपण्यास व त्याची संगोपन करण्यास एक माईलस्टोन ठरेल.

7) **सुधाकर दुबे :** दीक्षाभूमी सर्व सोयी सुविधायुक्त व विकसित तंत्राचा वापर करुन, हे वास्तुशिल्प सुरेख, सुंदर व अभिमान बाळगण्यासारखे होण्यासाठी, आपण सुचविलेल्या सुचना मूल्यवान आहेत. या सुचनांची दीक्षाभूमी स्मारक समितीने दखल घ्यावी ही आग्रहाची विनंती.

8) **सिद्धार्थ लभाने :** I appreciate all recommendations. These must be seriously taken into account and implemented at the earliest. It may Not be "just a dream."

9) **धम्म मनवर :** तज्ञाकडुन स्तुपाचे सखोल तांत्रिक निरीक्षण करुन त्यांचे अहवालानुसार पायव्याचे व स्तुपाची मजबूतीची कामे करावीत ही सुचना महत्त्वाची असून त्यामुळेच स्तुपाचे आयुष्य दिर्घकाळ वाढविण्यास मदत होईल.

10) **धर्मदास गजभिये :** दीक्षाभूमी विकास आराखड्यात बुद्ध धम्माचे स्पष्ट संकेत व प्रतिबिंब दिसावेत अशी नाविन्यपूर्ण कामे सुचविली आहेत. त्यामुळे ते दीक्षाभूमीला जागतिक स्तरावर घेउन जाईल याबाबत शंका नाही. ■ ■



बहुजन मानस



नागेश चौधरी ( बहुजन विचारवंत )
9970873560

# ओबीसी, मराठा दलित राजकारण दुय्यमतेच्याच भूमिकेत?

**मराठ्यांची सत्ता देखील ब्राह्मणी सत्तेच्या तुलनेत दुय्यम आहे. मराठा राजकारणी किंवा मराठ्यांचे राजकारण देखील ब्राह्मणी व्यवस्थेला धक्का न लावता होत असलेले राजकारण आहे. महाराष्ट्रामध्ये मराठ्यांचे राजकारण यशवंतराव चव्हाणांपासून तर आज शरद पवारांपर्यंत ब्राह्मणी व्यवस्थेच्या विरुद्ध भूमिका न घेता केवळ राजकीय सत्ता आपल्या हातामध्ये राहील आणि ब्राह्मणी व्यवस्था मात्र तशीच राहील अशाच प्रकारचं राजकारण केलेलं आहे.**

आ णि म्हणून या राजकारणामध्ये ज्यांना वाटा मिळत नाही, म्हणजे मराठ्यांच्या दुय्यम राजकारणामध्ये ज्यांना वाटा मिळत नाही ते मराठ्यांवर बोट ठेवतात, विरोध करतात आणि राजकारण करू पाहतात. मराठ्यांच्या विरुद्ध म्हणजे सुद्धा दुयमत्वाच्या विरोधात दुय्यमत्वी राजकारण किंवा राजकीय सत्ता मिळवणे ही भूमिका दिसते.

### दुय्यमत्वाचे राजकारण

जातीचे राजकारण वा जातीबद्ध राजकारण हे ब्राह्मणी व्यवस्थेला ब्राह्मणी आवर्ताला धक्का लावत नाही आणि म्हणून भारतामध्ये जे जाती आधारित पक्ष आहेत ते सर्व पक्ष दुय्यम राजकारण करणारे वा दुय्यम अशा राजकीय सत्तेसाठी कार्यरत आहेत. प्रथम स्थानासाठी सामाजिक सत्तेसाठी किंवा सामाजिक समतेचे नाही. ब्राह्मणी व्यवस्थेच्या किंवा ब्राह्मणी पॉवरच्या ब्राह्मणी नियंत्रणाच्या विरोधात नाही.

### जात पक्ष

डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी जो पक्ष काढला होता व त्यांची जी भूमिका होती ती भूमिका केवळ राजकारण नव्हतं तर इथली ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही नष्ट व्हावी ही भूमिका होती. परंतु जो राजकीय पक्ष त्यांच्या निधनानंतर चालू आहे तो पक्ष देखील जाती बद्ध राजकारण करतो आणि जातीव्यवस्थेचा विरोध न करता जातीचे राजकारण, जातीला राजकारणामध्ये स्थान या भूमिकेतून रिपब्लिकन पक्षाची वाटचाल सुरू आहे. हा पक्ष ब्राह्मणी व्यवस्थेच्या विरुद्ध बोलतो, मात्र प्रत्यक्षात जातबद्ध राजकारण करतो. जातव्यवस्था विरोधी राजकारण करतो का हा प्रश्न आहे.

### बसप

यानंतर दलितांचा मोठा राजकीय पक्ष हा बीएसपी. हा पक्ष काशीराम यांनी काढला आणि त्यांनी देखील हा पक्ष ब्राह्मणी व्यवस्थेविरुद्ध आहे अशी भूमिका सुरुवातीला घेतली. परंतु नंतर नंतर तो पक्ष ब्राह्मणी व्यवस्थेशी तडजोड करणारा झाला असं म्हणता येईल. कारण मग कांशीराम यांनी स्वतःचा व यादवाचा समाजवादी पक्ष आणि दलित यांचा पक्ष यांची जी सत्ता उ.प्र.त होती ती सत्ता बरखास्त करून ब्राह्मणी पक्षाच्या मदतीने मुख्यमंत्री पद मिळवलं. म्हणजे जाती व्यवस्थेच्या विरुद्धची भूमिका संपली. यावरून असं दिसतंय की जे पक्ष सुरुवातीला ब्राह्मणी व्यवस्थेच्या विरोधात विचार करणारे असतात त्या व्यवस्थेविरुद्ध बोलतात ते देखील नंतर ब्राह्मणी भूमिके समोर दुय्यम होतात. ज्याप्रमाणे भाजपने उत्तर प्रदेश मध्ये मायावतींना मुख्यमंत्री करून स्वतःकडे औट घटकेची दुय्यम भूमिका घेतली आणि कालांतराने त्यांनी मायावतींना दुय्यम करून टाकले.

### महाराष्ट्र

महाराष्ट्रामध्ये सुद्धा असे दिसते आहे की इथे जात आणि वर्गीय भूमिका घेणारा शेतकरी कामकरी पक्ष होता आणि तो पक्ष सुरुवातीला फुले शाहूंना




मानणारा होता, जातीच्या विरुद्ध होता. परंतु नंतर नंतर तो पक्ष देखील केवळ आर्थिक प्रश्न घेणारा झाला आणि जात वर्चस्व विरुद्ध राजकारण मात्र झालं नाही आणि म्हणून महाराष्ट्रामध्ये जात आणि वर्ग, जात आणि भांडवलशाही यांचा विरोध करणारा पक्ष देखील ब्राह्मणी भूमिके समोर दुय्यम होतो आणि मग ब्राह्मणांना त्याची भीती वाटत नाही. म्हणून आज खऱ्या अर्थाने जात व्यवस्था विरोधी, सामाजिक समतेसाठी राजकारण करण्याची गरज आहे. अमानवी आणि क्रूर अशी जात व्यवस्था नष्ट करण्यासाठी शूद्रातिशूद्राना एकवटण्याची गरज आहे. ही व्यवस्था बदलण्याची गरज आहे. ही जातिबद्ध अमानवी व्यवस्था बदलण्याची गरज आहे. शूद्रांनी आपसात भांडत राजकारण करणे म्हणजे ब्राह्मणी व्यवस्था जशीच्या तशीच राहील असे राजकारण करणे आहे. म. फुले म्हणतात सर्व बहुजन जाती या मालक आहेत परंतु ही मालकी आर्य भटांनी घेतली अशी त्यांची भूमिका होती आणि तीच व्यवस्था निर्माण करण्यासाठी राजकारण, समाजकारण करणे आवश्यक आहे. मूळ मालकी निर्माण करणे गरजेचे आहे. नाही तर दुय्यमत्वात राहणारे राजकारण, राजकीय पक्ष निर्माण होत राहतील, फुटत फाटत राहतील आणि समतेचे दूर दूर जात राहील.....कुठवर.....? ■ ■

# सोलापूर जिल्ह्यातील पक्षांतरांची लाट आणि प्रस्थापित पक्षांचे राजकारण

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका जाहीर होताच सोलापूर जिल्ह्यात राजकीय समीकरणांचा पट झपाट्याने बदलताना दिसत आहे. एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या धुरिण मानल्या जाणाऱ्या नेत्यांची रांग आता इतर दिशेने वळताना जनतेसमोर स्पष्टपणे दिसली आहे. माजी आमदार दिलीप माने (सोलापूर), माजी आमदार राजन पाटील अनगरकर (मोहोळ), माजी आमदार बबनदादा शिंदे यांचे सुपुत्र रणजित शिंदे (माढा) आणि सांगोला येथील माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांचे पक्षांतर हे त्याच प्रवाहाचे प्रतीक आहे. माळशिरस तालुक्यातील मोहिते-पाटील घराण्याने मात्र नेहमीप्रमाणे प्रबळ राजकीय स्थैर्य राखले आहे.**

लो कसभा आणि विधानसभा निवडणुकांदरम्यान त्यांनी दाखवलेला तटस्थपणा हा असंतोषाचा सूचक तर होता, पण विरोधाचा नव्हता. पक्षाने घेतलेल्या उमेदवार निवडींच्या निर्णयाशी असहमती ठेवत त्यांनी आपले स्वतंत्र राजकीय स्थान जपले. 2024 च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान महाराष्ट्रात भाजपविरोधी लाट उसळली. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेतील फुटीमुळे मतदारांमध्ये एक भावनिक वातावरण निर्माण झाले होते. त्या पार्श्वभूमीवर मी, दि. 5 मे 2024 रोजी ‘भाजप महाराष्ट्रात पराभूत होत आहे’ या विषयावर लिहिलेल्या लेखात, भाजप महाराष्ट्रात दोन अंकी आकडादेखील पार करू शकणार नाही, असे नमूद केले होते आणि तसेच घडले. अनेक प्रस्थापित घराण्यांनी त्या काळात थांबून पाहण्याची भूमिका घेतली. मोहिते-पाटील घराण्यानेही त्याच पद्धतीचा अवलंब केला आणि त्याचा परिणाम म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसच्या उत्तमराव जानकर यांचा विजय. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखालील पक्षात राजन पाटील अनगरकर यांच्याशी निगडित वाद आणि त्यानंतरच्या राजकीय प्रतिक्रियांमुळे पक्षातील अंतर्गत स्पर्धा अधिकच चिघळली. यावरून पुन्हा एकदा स्पष्ट झाले की महाराष्ट्रातील राजकारणात पक्षनिष्ठेपेक्षा जनाधार आणि घराण्यांचा प्रभाव जास्त महत्त्वाचा असतो. माझ्या चार दशके दीर्घ सामाजिक-राजकीय अनुभवावरून सांगायचे झाले तर, सत्तेची गती आणि विचारसरणीपेक्षा परिस्थिति आणि संधी हे घटक जास्त प्रभावी ठरले आहेत. शरदचंद्रजी पवार यांनी काँग्रेस सोडून एस. काँग्रेसची स्थापना केल्यापासून सोलापूरच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात या प्रकारच्या बदलांची मालिका सातत्याने दिसते. भाजपमध्येही असेच अंतर्गत ताण-तणाव कायम आहेत. माजी आमदार रामभाऊ सातपुते आणि मोहिते-पाटील यांच्यातील मतभेद स्थानिक स्तरावर उघडपणे जाणवतात. पक्षाच्या वाढीपेक्षा व्यक्तिकेंद्रित राजकारणाला अधिक प्राधान्य मिळाल्याने जनाधार कमी होण्याचा धोका वाढला आहे. अशात काही गट रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या विरोधात उभे राहिले असले तरी, त्यांचा प्रभाव मर्यादित राहील, अशी परिस्थिती दिसते. जयसिंह मोहिते पाटील यांनी रणजितसिंह यांच्या बाजूची भूमिका घेतल्याने या घराण्याची एकजूट पुन्हा स्पष्ट झाली आहे. त्यांनी शिक्षण, सहकार आणि अर्थक्षेत्र यामध्ये निर्माण केलेली पकड हाच मोहिते-पाटील घराण्याचा ‘राजकीय बॅकबोन’ ठरली आहे. ते थेट कोणत्याही पक्षाचे सदस्य नसले तरी घराण्याचे हित जपण्याची त्यांची क्षमता आणि स्वायत्त निर्णयशक्ती कायम राहिली आहे. सोलापूर जिल्ह्यातील आगामी निवडणुकांची दिशा ठरवण्यात मोहिते-पाटील घराण्याची भूमिका निर्णायक ठरणार आहे. राजकारणात ‘दृश्यमान शांतता’ म्हणजे निष्क्रियता नसते, ती तयारीची पायरी असते. पक्षांतरे, विघटन, आणि बदलणाऱ्या निष्ठा यामागे स्थानिक घटकांचा विचार नेहमीच निर्णायक असतो. आज परिस्थिती अशी आहे की, पक्षीय निर्णय आणि वैयक्तिक जनाधार यामधील संघर्ष हीच सोलापूरच्या राजकारणाची खरी ओळख बनली आहे. मोहिते-पाटील घराणे आपला प्रभाव अनेक पिढ्यांपासून जपत आले आहे आणि पुढच्या निवडणुकांमध्येही त्यांचा हा प्रभाव अधिक स्पष्टतेने दिसेल, हे नक्की. ■ ■

अविनाश टी काले
मो. 9960178273

“ जुना इतिहास घोकण्यापेक्षा, नवा इतिहास निर्माण करणे गरजेचे आहे. ”



# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आद्य चरित्रकार : ता. बा. खरावतेकर

**स्वातंत्र्यपूर्व काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर दोन जीवनचरित्रे लिहिल्याची नोंद आहे. उपलब्ध असलेल्या आंबेडकर चरित्रांत पहिले ठरावे असे चरित्र म्हणजे तानाजी बाळाजी खरावतेकर (चरित्र लेखकाच्या नावापुढे आवर्जून बी. ए. ही शिक्षण पदवी नमूद आहे.) यांचे 29 मार्च 1946 रोजी कराची (आता पाकिस्तानमध्ये) येथून प्रसिद्ध झालेले 'डॉक्टर आंबेडकर' हे चरित्र होय. व्यंकटेश बा. ठाकूर रविकिरण छापखाना, असायलम रोड, रणछोड लाईन्स, कराची असा मुद्रक व प्रकाशकाचा पत्ता पुस्तकात दिलेला आहे.**



या चरित्राची दुर्मिळ प्रत त्यावेळचे चरित्रकाराचे निकटचे मित्र शिवराम कुरंकर यांच्याकडून मिळवून मुंबईतील प्रा. रमाकांत यादव यांनी 2010 ला पुनर्मुद्रित केली. त्यामुळे आता हे चरित्र उपलब्ध आहे.

ता. बा. खरावतेकर हे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील 'खरावते' या गावचे, त्यांचे बालपण व शिक्षण कराची येथेच झाले. 1945 साली इतिहास हा विषय घेऊन त्यांनी मुंबई विद्यापीठातून बी. ए. ची पदवी संपादन केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतरचे कोकणातले ते पहिले पदवीधर. (मनोगत पृष्ठ चार) पुढे एल. एल. बी. च्या शिक्षणासाठी त्यांनी प्रवेश घेतला; पण वयाच्या अवघ्या 26 व्या वर्षी या उदयोन्मुख तरुणाचे असाध्य आजाराने दि. 05 सप्टेंबर 1946 ला मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयात अकाली निधन झाले.

ता. बा. खरावतेकर हे अभ्यासूवृत्तीचे, बुद्धिमान व सामाजिक जाण असलेले उद्योन्मुख तरूण होते. 6 मे 1945 रोजी मुंबई येथे ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे तिसरे अधिवेशन भरले होते. त्या अंतर्गत विद्यार्थी परिषद घेण्यात आली होती. या परिषदेत कराची येथील विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून खरावतेकर यांनी प्रतिनिधित्व केले होते.

1943 साली खरावतेकर अवघे 22 वर्षांचे विद्यार्थी असताना त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पत्र लिहिले होते. या पत्रातील मजकूर वाचल्यानंतर त्याकाळातील अस्पृश्य तरुण, डॉ. बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाने, नेतृत्वाने कसे भारावलेले होते याचे दर्शन घडते.

'डॉक्टर आंबेडकर' या चरित्राचे लेखन खरावतेकर यांनी 1943 सालीच लिहून पूर्ण केले होते. त्यावेळी चरित्रकार खरावतेकर यांचे वय अवघे 23 वर्षे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीने त्यावेळची युवापिढी किती प्रभावित होती. याचे प्रत्यंतर या उदाहरणाने यावे. चरित्र लवकर प्रकाशित व्हावयास हवे होते. परंतु दुसऱ्या महायुद्धामुळे त्याकाळात कागद टंचाईमुळे प्रकाशनास विलंब झालेले हे चरित्र खरावतेकर यांचे मित्र व्यंकटेश ठाकूर यांनी कागद परवाना तत्परतेने प्राप्त करून मार्च 1946 ला प्रकाशित केले. प्रकाशित झालेल्या या चरित्राची पृष्ठसंख्या 54 आहे. मूळ हस्तलिखिताताील पानांची संख्या दुप्पट होती. प्रकाशनातील घाईने व कागदाच्या टंचाईने ही पृष्ठसंख्या कमी केली असावी.

या चरित्रात लेखकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जीवनातील वादळी, संघर्षमय प्रवासाचे लेखन केले आहे. या चरित्रात मुख्य प्रकरणे नऊ असून प्रकरण दहावे, अकरावे व बारावे अगदी संक्षिप्त आहे.

बालपण व शिक्षण हे पहिले प्रकरण असून यात भीमरावांचा जन्म, शिक्षण, अभ्यासाची त्यांची जिद्द, त्यांनी मिळविलेल्या पदव्या, बडोदे संस्थानातील नोकरी, यावेळी त्यांना आलेले कटू अनुभव यांचे वर्णन आहे. भीमरावांच्या जन्माचे वर्ष 1892 लिहिले असून, त्यांचा जन्म उत्तर हिंदुस्थानात महू मुक्कामी झाला असल्याचे नमूद आहे.( भीमरावांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी मध्य प्रदेशात झाला.) रामजी सुभेदार यांचे मूळ गाव 'आंबेड' असल्याचे लेखकाने नोंदवले आहे. ('आंबडवे' असे गाव आहे.) हे अगदी प्रारंभिक चरित्र असल्याने व चरित्रकाराने उपलब्ध माहितीवरच विश्वासून हे लेखन केले असल्याने या त्रुटी आढळून येतात. आजच्या विद्यार्थ्यांपेक्षा डॉ. आंबेडकरांच्या शिक्षणात किती तरी अडी-अडचणी होत्या हे खरावतेकर उदाहरणांसह दाखवून देतात. रोज 18 तास अभ्यास करणारे आंबेडकर लेखकाने दर्शविले आहेत.

बडोदे संस्थानात नोकरी करत असताना होणारा अपमान, राहण्यासाठी जागासुद्धा मिळत नसल्याने बडोदे सोडून मुंबईच्या सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये प्रोफेसरची नोकरी करतात. पैसा शिल्लक टाकून लंडन येथे आणखी उच्च शिक्षणासाठी जातात. तेथील विद्यार्जनासाठी घेतलेले असामान्य कष्ट, ग्रंथांचा संग्रह करण्याची वृत्ती आदींचे वर्णन दुसऱ्या प्रकरणात आहे. तिसऱ्या आणि चौथ्या प्रकरणांत डॉ. बाबासाहेबांच्या स्वभाव वैशिष्ट्यांना रेखाटणारे प्रसंग चरित्रकाराने दिले आहेत. महाडच्या सत्याग्रहात हजारो लोक समाविष्ट झालेत. त्यांना खाण्यापिण्याचे पदार्थ मिळू नयेत असा कट स्पृश्य जातीतील लोकांनी केला. यावर तोडगा म्हणून परिषदेच्या चालकांनी मुरमुऱ्याची पोती मागविली. मात्र डॉ. बाबासाहेब व त्यांच्या प्रमुख सहकाऱ्यांसाठी स्वयंपाक केला. डॉ. बाबासाहेबांना जेव्हा हे कळले, तेव्हा 'इतर लोकांची जी व्यवस्था तीच आमची व्यवस्था' असे सांगून सर्वांसोबत त्यांनी मुरमुरे व फुटाणे खाणे पसंत केले. हा प्रसंग लिहून खरावतेकर भाष्य करतात 'अशा पुढाऱ्यावर अस्पृश्य जनतेचा विश्वास नसणार तर कोणावर असावयाचा? केवढा हा मनाचा मोठेपणा व केवढी ही स्वार्थ त्यागाची वृत्ती!' (पृष्ठ 16) याच प्रकरणात पुणे कराराबाबत डॉ. बाबासाहेबांची भूमिका मांडण्याचा प्रयास केलेला आहे.



प्रा. डॉ. सत्यजित सूर्यवंशी
मो. 7775008700

डॉ. बाबासाहेब हे वेळेचे महत्त्व जाणणारे व्यक्तिमत्त्व. त्यांचे नियोजन व हाती घेतलेले काम उरकण्याची वृत्ती याचे वर्णन 'दैनंदिनी' या पाचव्या प्रकरणात आलेले आहे. सतत वाचनात व अभ्यासात मग्न राहणारे आंबेडकर आपल्यासमोर प्रस्तुत करण्यात आले आहेत. डॉ. आंबेडकरांची जगमान्य विद्वत्ता त्यांच्या अनेक भाषणातून लेखांतून आणि ग्रंथातून चिरस्थायी झालेली आहे. त्यांच्या या वैचारिक ग्रंथलेखनाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न 'साहित्यिक' या शीर्षकाने सहाव्या प्रकरणामध्ये केला आहे.

'राजकारण, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र वगैरे महत्त्वाच्या विषयांवर डॉ. आंबेडकराचे लेखन आहे व ते प्रत्येक लिखाण पहिल्या प्रतिचे आहे. आंबेडकरांचे विचार राजकारणासंबंधी काय, अर्थशास्त्रासंबंधी काय मौलिक आणि स्वतंत्र आहेत. त्या प्रत्येकावर त्यांच्या विद्वत्तेचे, कर्तृत्वाचे, लढाऊ वृत्तीचे व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते'. (पृष्ठ 34) अशा शब्दांत लेखकाने त्यांच्या लेखनाचे मूल्यमापन केले आहे. डॉ. आंबेडकरांच्या प्रयत्नाने सार्वजनिक जीवनातील अस्पृश्यता दूर करण्याची काही उदाहरणे 'सार्वजनिक कामगिरी' या प्रकरणात दिलेली आहेत. 23 नोव्हेंबर 1940 ला वरळी येथील भाषणाचा अंश (पृष्ठ 37) दिला आहे. 'आपण आपल्या चळवळीचा पल्ला बराच गाठला आहे, तरी पण आपणांस अजूनही बरेच कार्य करावयाचे आहे.' डॉ. बाबासाहेबांचा हा इशारा लेखकाने या प्रकरणाच्या शेवटी नोंदवला आहे.

क्रमशः ■ ■

## लेकराची कसोटी

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

आई आणि वडील ही आपल्या आयुष्यातील सर्वात महत्वाची दोन पात्रे आहेत, पण आई या पात्राची महती तिच्या जिवंतपणी कळते, याऊलट बापाची महती त्यांच्या मृत्युनंतर कळते असा अनेकांचा समज आहे. वडिलांच्या निधनानंतर समजते की ते आपली ढाल असतात. अभेद्य असे कवच असतात. बाप म्हणजे छत, बाप म्हणजे अन्न, वस्त्र आणि निवारा तसेच बाप म्हणजे सुखासमाधानाची झोप देणारे एक रामबाण औषध असते. मायबाप म्हणजे आपल्या आयुष्यातील कल्पवृक्ष.लेकरांच्या सर्व चुका ते पोटात घालतात. लेकरू कितीही रागावले तरी त्याची समजूत काढतात. कारण त्यांना ठाऊक असते की, आपल्या बाळाला अजून योग्य ती समज यायची आहे. आपले लेकरू नासमज आहे. आता ही झाली मायबापाची भूमिका. पण हे सर्व करतांना त्यांना या गोष्टीची जाणीव त्याच्या वडिलांनाही असते की, आपण जेव्हा म्हातारे होऊ तेव्हा आपलीही अवस्था या नासमज लेकरासारखीच होईल. म्हातारपणात आपली बुद्धी कमकुवत होईल. ना शरीरावर आपली पकड राहील ना जिभेवर. आज आपण जर आपल्या लेकरांवर रागावलो तर ते आपली तक्रार इतरांच्या जवळ करतात. म्हातारपणी आपल्याला जर याच लेकरांनी दुःख दिले तर आपणही आपल्या भावना दुसऱ्यांना सांगितल्या तर आपल्या मुलांना ते सहन होईल का? लेकरांनी केलेल्या चुकांचे, त्यांच्या तक्रारींचे आपल्याला कधीही वाईट वाटले नाही. आपण त्यांना सदैव क्षमा करीत आलो. पण ते आपल्याला क्षमा करतील का? लेकरांचा प्रत्येक हट्ट पुरवण्याचा आपण आपल्या परीने प्रयत्न केला. त्यांनी व्यक्त केलेल्या रागाला आपण सहज सहन केले. कारण आपल्याला हे माहीत होते की, आपण यांचे पालक आहोत. वृद्धापकाळात आपलीही अवस्था एखाद्या लहान मुलासारखीच होईल. तेव्हा आपली भूमिका बदललेली असेल. त्यावेळी आपली लेकरे आपले पालक बनतील. त्यांनीही आपल्या या अवस्थेमध्ये आपल्याला सांभाळून घ्यावे लागेल. कारण आपली मुले आपला अंश, आपला वंश आहेत. आयुष्यभर आपण त्यांच्यासाठी जे कष्ट उपसले. त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी आपल्या ईच्छा आणि आकांक्षांना तिलांजली दिली. याची त्यांना जाणिव त्यांनी ठेवावी एवढीच आपली माफक अपेक्षा असते.म्हणतात ना, हत्ती गेला शेपूट राहीले. तसेच आपले सर्व आयुष्य गेले, ऊरले ते आयुष्यातील अखेरचे चार दिवस. या चार दिवसांचा प्रवास त्यांच्या सानिध्यात आनंदात पार पडला तर ईहलोकीची यात्रा संपली तरी आनंदाने या जगाचा निरोप घेता येईल. आपल्या लेकरांना आभाळभर आशिर्वाद देतांना मन प्रसन्न होईल, पण आपली लेकरे आपल्याला या क्षणांची अनूभुती देतील का?लक्षात ठेवा ! कुणाचेही मायबाप कशाचीही अपेक्षा करत नाहीत. तुमच्यापासूनही अवाजवी अपेक्षा त्यांनी केलेली नसेल. पण आयुष्यभर ज्यांनी तुम्हाला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले त्यांचा सांभाळ जर तुम्ही अखेरच्या क्षणी केला नाही तर त्यांचा त्याग, समर्पण धुळीस मिळाले असेच म्हणावे लागेल. एक गुणी पोर म्हणून त्यांचे लेकरू काळाच्या कसोटीवर खरे उतरले पाहीजे हाच नात्यातील गोडवा आहे.' ■ ■

# शासनकर्ती जमात – स्वाभिमानाचा प्रवास आणि संघर्षाचा संकल्प

**भारतात आज प्रत्येक घटक सत्तेच्या केंद्रात पोहोचण्याची आकांक्षा बाळगतो. पण शासनकर्ती जमात बनणे म्हणजे केवळ निवडणुकीत जिंकणे नाही, तर विचाराने, संघटनाने आणि आत्मभानाने समाजाला दिशा देणे होय. केवळ संख्या नाही, तर सामर्थ्य, एकजूट आणि जागृती हाच खरा सत्तेचा पाया आहे. कारण संख्येने मोठे असणे पुरेसे नाही, विचाराने, संघटनेने आणि कृतीने सक्षम बनल्याशिवाय सत्ता हातात येत नाही. अंतर्गत मतभेद आणि उपगटवाद जे थांबवतात प्रवास. आपला समाज उपजतच विभागला गेला आहे. जात, पंथ, संस्था आणि अहंकार यांच्या भिंतींनी. 'आपण सारे एक' ही भावना अजूनही कृतीत उतरलेली नाही.**




नेतृत्वाचा अभाव आणि सत्ता-लालसा मुळे खरे लोकनेते मागे पडतात, संधीसाधू पुढे येतात. नेतृत्व ही जबाबदारी नव्हे तर प्रतिष्ठेची जागा बनली आहे. जनतेचा विश्वास या स्वार्थी खेळांमुळे हरवत चालला आहे. शिक्षण आणि अर्थव्यवस्थेतील कमजोरीमुळे शासन हे ज्ञानावर आणि संपन्नतेवर उभे असते. शिक्षणाचा प्रकाश आणि आर्थिक स्वावलंबन हेच सत्तेचे खरे शस्त्र आहेत. जे आजही अनेकांना न मिळाल्याने समाज निर्णयक्षम होत नाही. धर्म, भाषा, प्रांत आणि जातीच्या नावाखाली समाजात फूट पाडली जाते. एकजूट मोडली की सत्ता हातातून निसटते. 'आपण सत्तेसाठी जन्मलो नाही' ही मानसिक गुलामी अजूनही टिकून आहे. स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवला नाही तर इतर आपल्या भविष्यावर नियंत्रण ठेवतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या त्रिसूत्रीची आज सर्वाधिक गरज आहे. शिका, संघटित व्हा, संघर्ष करा. विचारशक्ती आणि विवेक विकसित केला तर कोणताही समाज झुकत नाही. सत्ता टिकवायची असेल तर आर्थिक स्वातंत्र्य अनिवार्य आहे. उद्यमशीलता, तंत्रज्ञान आणि व्यवसाय यात सहभाग वाढवावे लागेल. वैयक्तिक महत्वाकांक्षा बाजूला ठेवा. सामूहिक विचार, सामूहिक निर्णय आणि सामूहिक नेतृत्व यांवर भर द्यावे लागेल. प्रत्येक गल्लीत, प्रत्येक गावात संघटनाचे बी पेरा. वाचनसंस्कृती, संवाद आणि बौद्धिक प्रबोधन वाढवावे लागेल.



प्रविण बागडे
9923620919

आपल्यात नेतृत्व करण्याची क्षमता आहे, हे प्रत्येकाने जाणले पाहिजे. आत्मसन्मानाचा जाज्वल्य भाव निर्माण झाला की सत्ता आपोआप आकर्षित होते. शासनकर्ती जमात होणे हा प्रवास एका पिढीचा नाही, तर शतकांचा संघर्ष आहे. पण या संघर्षात जर आपण विचार, संघटन आणि आर्थिक बळ या त्रिसूत्रीला स्वीकारले, तर तो दिवस दूर नाही, जेव्हा आपण केवळ मतदार नव्हे, तर सत्ताधारी आणि निर्णयकर्ते म्हणून इतिहास लिहू. ■ ■

# समाजात आजचा मोठा प्रश्न ?

**समाजात आज सगळ्यात मोठा प्रश्न हा नाही की, कोणाचे व कोणते व्यवसाय चालत नाही आहेत!, समाजात आज सगळ्यात मोठा प्रश्न हा आहे की, लोकांनी कोणत्या एका संघटनेखाली येऊन काम करावे, जिथे त्यांना प्रगतीची संधी (Growth Opportunities) दिसेल, आणि अनुभवी लोक पाठीशी राहतील.**

ज्यांना सर्वच क्षेत्रांबाबत "Local to Global" बाजारपेठेची जाणीव असेल, नाहीतर अगोदर सगळे मिळून माहिती गोळा करतील. टेंडर प्रक्रियेपासून सर्व गोष्टीवर चर्चा करतील. मी म्हणतो, सगळेजण लहान-लहान संघटना उघडून नको त्या गोष्टी करत आहेत आणि समाजाची दिशाभूल करत आहेत.

अशा कामांमुळे समाज 'गरिबी आणि लाचारी'कडे वाटचाल करत आहे, किंवा चुकीचे मार्ग निवडून पैसा कमावत आहे.

असा समाज आपल्याला घडवायचा आहे का? हा प्रश्न त्यांनी स्वतःला विचारावा, जे फक्त 'अध्यक्ष पद' आणि प्रसिद्धीसाठी धावपळ करत आहेत, पण कार्य काहीच करत नाहीत. जिथे लोकहिताचा उद्देश आणि समता या भावनांचा विचार केला जाईल आणि सर्वजण रस्त्यावर उतरून प्रामाणिकपणे "Research आणि Analysis" करून कोणताही प्रकल्प उभारतील–

अशाच कार्यातून खरा विकास साध्य होईल. मी म्हणतो, "Under One Roof" सामाजिक बांधणीचा विचार कोणी करत नाही. प्रत्येकाच्या मनात फक्त स्वतःचीच काळजी आहे, जणू सगळेच निवडणुकीत उभे राहून जिंकणार आहेत!

अशी मानसिकता समाजाच्या विकासावर नकारात्मक परिणाम करते.

मिळालेल्या हक्क आणि अधिकारांचा योग्य वापर करता येत नाही आणि त्यामुळे आज युवकांची परिस्थिती बिकट झाली आहे. यासाठी आपण सगळ्यांनी एकत्र येऊन एकमेकांचे ऐकून काम करणे आवश्यक आहे.

डॉ. जयप्रकाश बोधी
9421725648

आज अर्थकारण हा मोठा मुद्दा नाही. खरा मुद्दा म्हणजे 'सामाजिक एकजुटीच्या विचाराला' प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून चालना देणे.बाकी सर्व समस्या सोप्या पद्धतीने सोडवता येतात. उद्योग करणे म्हणजे काही मोठी Rocket Science नाही की ते कोणालाच जमणार नाही.



सगळ्यात आधी आपण सर्वांनी एकाच संघटनेखाली एकत्र येणे आवश्यक आहे. तेव्हाच समाजाचा विकास होईल आणि डॉ. बाबासाहेबांनी दिलेले 'हक्क व अधिकार' टिकवता येतील. यासाठीच एका छत्राखाली एकच संघटना उभी केली पाहिजे आणि एकाच संघटनेच्या माध्यमातून मोर्चे आणि आंदोलने आयोजित केली पाहिजेत. जसे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मातृत्वपूर्ण संघटना स्थापन केल्या, त्याप्रमाणेच कर्मचारी आणि अधिकारी यांनी सामाजिक बांधिलकी समजून भाग घेतला पाहिजे. राजकीय लाभासाठी, प्रसिद्धीसाठी तयार झालेल्या व समाजाचे नुकसान करणाऱ्या संघटना बंद केल्या पाहिजेत.

RSS-BJP व इतर मनुवादी विचारांचे भट, नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांना समाजबंधूंनी स्पष्ट सांगितले पाहिजे, 'आप हमारे समाज के दुश्मन हो, आपका और हमारा कोई संबंध नहीं है.' अशी स्पष्ट भूमिका घेतल्यासच आपण यशस्वी वाटचाल सुरू करू शकतो. ■ ■

# विपस्सना द्वेष म्हणजे धम्मद्रोह होय !

**अष्टांगिक मार्गामध्ये :-** 1. सम्यक दृष्टी, 2. सम्यक संकल्प, 3. सम्यक वाचा, 4. सम्यक कर्म, 5. सम्यक आजीविका, 6. सम्यक व्यायाम, 7. सम्यक स्मृती व 8. सम्यक समाधी याचा समावेश होतो. आपले शरीर निरोगी ठेवण्यासाठी जसे शारीरिक व्यायाम करतो, तसेच मनाला निरोगी ठेवण्यासाठी मनाचा व्यायाम म्हणजे ही विपश्यना साधना होय.जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे की, जो व्यक्ती शरीराने आणि मनाने निरोगी आहे, अशा व्यक्तीला सुदृढ आणि सक्षम म्हटल्या जाते. विपश्यना साधनेमध्ये मानवी मन हे केंद्रस्थानी आहे. शरीरावर होणाऱ्या प्रतिक्रिया या मनातून निर्माण होतात. म्हणून मन हे निरोगी असेल तरच शरीर निरोगी राहण्यास मदत होते.ही वैज्ञानीक साधना शिकण्यासाठी विविध भाषा, जाती, धर्म, संप्रदाय, लिंग असलेले लोक मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहेत. त्यामुळे जातीय सलोखा निर्माण होण्यात या विधीचा मोठा हातभार लागत आहे. आज दहशतवाद व अण्वस्त्राच्या भीतीने जगात अशांतता व अस्वस्थता निर्माण होत आहे. तेव्हा जगात शांतता नांदण्यासाठी विपश्यना विधीची फार मोठी मदत होत आहे. जगात ठिकठिकाणी विपश्यना केंद्रे स्थापन होत आहेत. त्यामुळे या विधीचा साऱ्या जगात झपाट्याने प्रसार होत आहे.भारतातील पहिल्या महिला आय.पी.एस. अधिकारी किरण बेदी यांनी कैद्यांसाठी विपश्यना अभ्यासाची व्यवस्था केली होती. त्यामुळे गुन्हेगारी जग सुधारण्यास या विधीचा उपयोग होत आहे.शासन त्यांच्या अधिकाऱ्यांना ही विद्या शिकता यावी म्हणून विपश्यना शिबिराला पाठविण्याची व्यवस्था करीत आहेत. प्रशासकीय कामे करतांना मानसिक तणाव दूर होतो. ही विधी शिकतांना भगवान बुद्धांनी सांगितलेला शील-समाधी-प्रज्ञा तसेच पंचशीलेची शिकवण मिळत असल्याने साधक वर्ग नीतीमान बनत असतो. त्यामुळे भ्रष्टाचाराला वाव राहत नाही. वक्तशीरपणा, प्रामाणीकपणा हे गुण साधक वर्गात वाढीस लागत आहेत.लहान मुलांपासून ते मोठ्या माणसापर्यंत आज शिबिरे आयोजीत होत आहेत. त्यामुळे मैत्री, करूणेचे भगवान बुद्धाचे तत्वज्ञान जनमानसात रूजत आहेत. सामाजिक सलोखा निर्माण होण्यास तसेच आजच्या अनैतिक जगात माणसाला सदाचारी, चारीत्रवान, निरोगी बनविण्यासाठी या विधीचा फार मोठा हातभार लागत आहे.विपश्यनेचा व्यक्तिगत दृष्टीने नियमित अभ्यास केल्याने मनातील राग, द्वेष, मोह, तृष्णा, वासना, लोभ, भयं असे विकार नष्ट होतात. त्यामुळे दुःख आणि विकारातून मुक्त होवून मानवाचे कल्याण होते. तसेच सामाजिक दृष्टीने विशुद्धी, पावित्र, सदाचार, नैतिकतेचा पाया मजबूत होवून समाजविकास घडून येतो.आज जगासमोर उपासमार, गरिबी, जातीयवाद, हिंसाचार, दहशतवाद, हुकूमशाही, युद्धजन्य परिस्थिती असे जे भयावह स्थिती दिसत आहेत, त्याला शांत करण्यासाठी भगवान बुद्धाचे समता, स्वातंत्र, बंधुत्व व न्याय तसेच अहिंसा, प्रज्ञा, शील, करूणा व मैत्रीचे तत्वज्ञान म्हणजेच विपश्यना विधी हेच एकमेव उत्तर आहे. म्हणून विपश्यना साधना ही मानवी कल्याणाचा मार्ग आहे.आपण सर्व विपश्यना करा, नियमित पणे करत रहा. हा भ. बुद्धांचा उपदेश आहे. सुत्त पिटकाच्या मज्जीम निकाय ग्रंथात सतिपट्ठान सुत्तात आहे.4 डिसेंबर 1954 ला डॉ. बाबासाहेबांनी रंगून येथिल भाषणात विपश्यना नाकारली काय? 4 डिसेंबर 1954 ला म्यानमारला रंगून येथे जागतिक बौद्ध धम्म परिषद झाली. या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण झाले. आपल्या भाषणाचे त्यांनी मेमोरेन्डम भाग 1 व भाग 2 केले. भारतात बौद्ध धम्माचे कशा प्रकारे उत्थान करता येईल यावर विविध योजना परिषदेत मांडल्या. त्यात क्र. 6 चा मुद्दा असा होता की बौद्ध धम्माच्या अनुयायासाठी छोट्या स्वरूपात धम्म ग्रंथाची आवश्यकता आहे. कारण धर्मांतरीत बौद्धांची ग्रंथाची गरज पूर्ण करणे आवश्यक होते. ते म्हणाले कि, पाली भाषेतील 73 खंड वाचण्याची अपेक्षा सामान्य व्यक्तीकडून करता येणे शक्य नाही. या ग्रंथात भ. बुद्धांच्या सामाजिक व नैतिक शिकवणुकीवर भर देणे आवश्यक राहिल. ते म्हणाले की, ध्यान, मनाचे निरीक्षण व अभिधम्म यावर फार भर दिला जात आहे. या मार्गाने भारतामधे बौद्ध धम्म नवनिर्मित ग्रंथात प्रस्तुत केला तर आमच्या धेय्यात अडथळा निर्माण होईल. डॉ. बाबासाहेब English मधे काय म्हणाले,



6) I will now turn to the preliminary steps which must be taken for the revival of the Buddhism in India I mention below those that occur to me

1) The preparation of Buddhist Gospel which could be a constant companion of the convert.The want of a small Gospel containing the teaching of the Buddha is a great handicap in propogation of Buddhism in having the message of christ, contained in a small booklet.The Bible This handicap in the way of the propagation of Buddhism must be removed. In regard to the preparation of Buddhas Gospel care must be taken to emphasis (भर देणे) the social and moral teaching of the Buddh. I have to emphasis (हे मी भर देवून सांगत आहे कारण) this because what is emphasis is meditation, contemplation and Abhidhamma.(ध्यान, अनुपश्यना आणि अभीधम्म या वरच अधिक भर दिल्या जात आहे) This way of presenting Buddhism to Indian would be fatal to our cause. (या मार्गाने जर बुद्ध धर्म भारतात प्रस्तुत केला तर तो आमच्या हेतुसाठी अडथळा ठरेल किंवा घातक ठरेल) fatal चा अर्थ अडथळा सुद्धा होतो. रस्त्यात अपघात होतो तेव्हा fatal आक्सिडेंट म्हणतात fatal शब्द त्यावेळी घातक अर्थी वापरतात. अन्यथा अडथळा असा अर्थ आहे. या वरून आपल्या लक्षात येईल की, त्यांनी धम्म ग्रंथ लिहताना ध्यान व अभीधम्म या वर अधिक भर द्यायचा नाही असे म्हटले, Emphasis म्हणजे भर देणे होते. भर न देणे म्हणजे नाकारने होत नाही. पुस्तक लिहताना या बाबी सुद्धा बुद्ध आणि धम्म ग्रंथात समाविष्ट केल्या आहेत. धम्म म्हणजे काय? या प्रकरणात कायानुपश्यना, चित्तानुपश्यना, वेदनापश्यना, धम्मानुपश्यना नमुद केली आहे. सम्यक समाधीचा तर उल्लेख आहेच, 35 वेळा Meditation शब्ददेखील आहे. अभिधम्म शिवाय बुद्ध धम्म कसा पूर्ण होवू शकेल?

ग्रंथ लिहताना अधिक भर कशावर द्यायचा व कशावर द्यायचा नाही या बाबत डॉ. बाबासाहेब बोलले, याचे कारण त्या वेळी म्यानमार मधे निव्वळ जंगलात जावून ध्यान करणारे भिक्खू होते, तसे डॉ. बाबासाहेबांनी बघितले होते. ते त्यांना नको होते तर धम्म प्रचारक हवे होते. नुकतेच हिंदू धर्मातून बाहेर आलेल्या समाजाला स्वाभिमानी चळवळीत (self respect movement) पक्क करायचे होते. शील आणि नैतिकता शिकवणे गरजेचे होते. लगेचच ध्यानाकडे अधिक भर दिला तर चळवळीला गती आली नसती. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ते नाकारले नाही हे स्पष्ट आहे. अधिक भर न देणे Not Emphasis म्हणजे नकारान्त नव्हे. not Emphasis म्हणजे अधिक भर न देने होते. नाकारले असते तर स्पष्ट पणे I do not accept किंवा I denied it असे लिहले असते, ते स्पष्टवक्ते होते. हा मुद्दा पुस्तकातील मसुदा कसा राहील या वर होता. लेखक एखाद्या मुद्द्यावर अधिक भर न देता मुद्दा कायम ठेवत असतो तसे डॉ. बाबासाहेब म्हणाले. सतिपट्ठान सुत्त डॉ. बाबासाहेब कसे काय नाकारतील? तो तर बुद्धाचा शोध आहे. सुत्तपीटकाचा अविभाज्य अंग आहे.विपश्यनाला खूप महत्व द्या असे आम्ही सुद्धा म्हणत नाही आमचे म्हणणे असे की तो भ. बुद्धांचा सतिपट्ठान सुत्तातिल उपदेश आहे हे सूर्यप्रकाशा इतके स्पष्ट आहे. त्यावर टीका करू नका, टिंगल करू नका, द्वेष करू नका.संवर्धन करा. तुम्ही विपश्यना करा की नका करू पण धम्म उपदेशाची चुगली करून गैरसमज पसरवू नका.

नितीन अंभोरे
मो. 8956107061

Contemplation म्हणजे विपश्यना असा अर्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाली शब्द कोशात (लेखन आणि भाषणे खंड 16) मध्ये सांगितला आहे Contemplation म्हणजे विपश्यना बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथात डॉ. बाबासाहेबांनी खालील प्रमाणे धम्म म्हणजे काय या प्रकरणात लिहले आहे.Herin a monk abides contemplating the body as body, (कायानुपश्यना) strenuous, mindful and self possessed, having overcome both the bankering and discontent common in the world He abides contemating the feelings as feeling (वेदनानुपश्यना )He abides contemplating the mind as mind ?(चित्तानुपश्यना)He abides contemating the ideas as ideas ,(धम्मानुपश्यना )डॉ. बाबासाहेबांच्या इंग्रजी मेमोरेन्डम 4 डिसेंबर 1954 चा अर्थ नीट समजून न घेता डॉ. बाबासाहेबांनी विपश्यना नाकारली म्हणून ओरड केली जाते. सामान्य माणसाची दिशा भूल केली जात आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आनापानचा अर्थ, 'Inhaled, extended, breath, inspiration, respiration' असा पाली डिक्शनरीत (खंड 16) सांगितला आहे. ते स्वतः ध्यान करायचे असा उल्लेख चांगदेव खैर्मोडे लिखित चरित्र ग्रंथात आहे. असे सर्व असताना ते ध्यान विरोधी होते, विपश्यना विरोधी होते असा अपप्रचार केला जातो या अशा लोकांपासून सावध रहा.विपश्यनेचा इतका स्पष्ट उल्लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध आणि त्याचा धम्म ग्रंथात केला असूनही त्यांनी विपश्यना नाकारली असा अपप्रचार करणे समाजाची दिशाभूल करणे आहे.शब्दांचे अर्थ :-1) Emphasis :- (giving) special importance or attention (एखाद्या गोष्टीकडे दिलेले) विशेष लक्ष किंवा (तिला दिलेले) विशेष महत्व, प्राधान्य, भर.(Oxford English-English-Marathi Dictionary Page No,452) 2) आनापान :- Inhaled, extended breath, inspiration, respiration (आन +अपान)(पाली शब्दकोष, खंड 16, लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर) 3) विपस्सको हा पाली शब्द आहे. विपश्यनचे स्त्रि5यापद त्याचा इंग्रजी अर्थ खुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला तो असा - "Contemplating, endowed with"(पाली शब्दकोष, Volume 16, लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर)या वरून आपल्या लक्षात येईल की डॉ. बाबासाहेबांनी विपश्यना नाकारली नाही. तर स्वीकारली आहे.सम्यक समाधीचा उपदेश म्हणजे काय? मनात वाईट विचार येवू न देणे व आलेले बाहेर काढणे. हे कसे साध्य करायचे? केवळ वंदना म्हटल्याने शक्य आहे काय? मुळीच नाही तर या साठी सतिपट्ठान सुत्त हे प्रॅक्टिकल आहे. ज्यामुळे मन निर्मळ होईल अर्थात सम्यक समाधीचा उद्देश पूर्ण होईल. बौद्ध धम्मातील सम्यक समाधी म्हणजे हिंदू समाधी नव्हे, बुवाबाबाची नव्हे. बुद्धांच्या विपश्यना ध्यान पद्धती मधे उपासक सतत जागरूक असतो. मनावर पहारा देत असतो. हे ध्यान एकदा अवगत झाले की केवळ बसून विपश्यना करायची नसून 24 तास करू शकता. आपण काय करतो याची सतत जाणीव ठेवणे. याला स्मृतीची प्रतिष्ठापणा म्हणजे, सतीपठाण सुत्त म्हणतात आणि हे विशिष्टपणे केल्या जाते म्हणून विपश्यना म्हणतात.विपश्यना शिबिरात शील पालन अनिवार्य असते, 10 पारमितांचा अभ्यास सुद्धा आपल्याला समजतो जो कुठेच समजाविले जात नाही. मैत्री भावना व अष्टशील तसेच बुद्धाचे उपदेश प्रवचनात सांगितल्या जाते. विपश्यना शिबिर म्हणजे धम्म उपदेशांची प्रयोग शाळा आहे दुसरे तीसरे काही नाही. ■ ■






रमाईचे स्वप्न - २४५

## बोधीवृक्ष बुद्ध विहार

अंगुलीमाल नगर, नझुल ले आऊट, जरीपटका, उत्तर नागपूर. विहारामध्ये दररोज सायंकाळी नियमित वंदना, पौर्णिमा उत्सव, वर्षावास, धम्मचक्र प्रवर्तन दिन, बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर, सम्राट अशोक, यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येतात. मोरश्वर म्हैसकर, कांता म्हैसकर, आशा ढोक, कल्पना नाईक सह आदी सक्रीय आहेत.

संवाद मित्र, डी.आर. कांबळे
मो. 8600924170

### बार्टीने विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमादवारे सातार्‍यात साजरा केला

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिन!

**पुणे :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रोप्यमहोत्सवी शाळा प्रवेश दिनानिमित्त सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट व सामाजिक न्याय खात्याचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली बार्टी मुख्यालय व सातार्‍याच्या प्रतापसिंह भोसले शाळेत विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम साजरे करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे मार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खर्‍या अर्थाने अभिवादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शाळा प्रवेश दिनासंबंधात सर्व दस्तऐवज एकत्रित करून एक संशोधन प्रकल्प राबवण्याचा मानस बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी व्यक्त केला आहे. सोबतच लंडन येथील डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या निवासस्थानाच्या धर्तीवर डॉ. 'आंबेडकर रूम' शासनाच्या मार्गदर्शनाखाली करण्याचा संकल्प व्यक्त केला. बार्टी संस्थेच्या मध्यमतुन विद्यार्थी दिन संपूर्ण राज्यामध्ये समतादुत विभागाच्यावतीने मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. त्याचाच भाग म्हणून बार्टी मुख्यालयात व राज्यभर कार्यक्रम घेण्यात आले बार्टीमध्ये झालेल्या कार्यक्रमाला महासंचालक सुनील वारे,यावेळी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी सांगली अध्यक्ष श्रीमती सरिता नरके, बार्टीचे



निबंधक विशाल लोंढे, विभाग प्रमुख अनिल कारंडे, मारुती बोरकर, वृषाली शिंदे नितीन चव्हाण व बार्टीतील अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते. संचालन श्रीमती वैशाली खांडेकर व आभार प्रकल्प व्यवथापक सुमेध थोरात यांनी मानले.

सातारा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 7 नोव्हेंबर 2025 रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन विद्यार्थी दिन म्हणून छत्रपती प्रताप सिंह हायस्कूल जुना राजवाडा, सातारा येथे साजरा करण्यात आला.

बार्टीच्यावतीने सवलतीच्या दरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांचे मौल्यवान ग्रंथ, पुस्तके बुक स्टॉलवर उपलब्ध करून देण्यात आली होती. विद्यार्थी दिनानिमित्त

यापसंगी सातार्‍याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी मल्लिकार्जुन माने, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गावडे, जिपचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी युले, परिविक्षाधीन मुख्याधिकारी प्रज्ञाशील वाघमारे, महिला व बालविकास अधिकार ठोंबरे, शिक्षणाधिकारी आणि नायकवडी, शिक्षण अधिकारी धनंजय चोपडे, गटशिक्षणाधिकारी रवींद्र खंदारे समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सुनील जाधव, बार्टीचे विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड, छत्रपती प्रतापसिंह हायस्कूल सातार्‍याचे मुख्याध्यापक देशमाने, पत्रकार अरुण जावळे, बार्टीचे रामदास लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थी दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला.

विद्यार्थ्यांनी समता रॅली द्वारे संविधानाच्या सामाजिक समतेच्या मूल्यांचा नाम फलकाद्वारे संदेश दिला. यामध्ये प्रा. रमणी बबीता आकाश, नितीन चंदनशिवे, प्रा. सुमित गुणवंत, बबन सरोदे, रमेश बुरबुरे, संदेश शालिनी संभाजी कर्डक, गजानन गावंडे, सुदेश जगताप, आकाश आप्पा सोनवणे यांनी सहभाग या नामवंत कवींनी यात सहभाग घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला प्रबोधनात्मक व काव्यातून वंदन केले.

## महत्वाचे

### दक्षिण नागपूर विधानसभा परिसरात बी.आर.एस.पी. पक्षाची बैठक



**नागपूर :** दक्षिण नागपूर विधानसभा क्षेत्रात बी.आर.एस.पी. पक्षाच्या कार्यकर्त्यांची कन्व्हेसिंग बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत पक्षाच्या नव्या सदस्यांचे स्वागत करण्यात आले. पक्ष प्रवेश सोहळ्यात अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत सहभागी कार्यकर्त्यांचा सत्कार करून त्यांना पक्षाचे बुलेटिन आणि आदिवासी जन चेतना महासंमेलनाचे पत्रक देण्यात आले. बैठकीत पक्षाचे जिल्हा प्रभारी आणि आदिवासी नेते यांनी मार्गदर्शन करत सामाजिक जागृती आणि राजकीय परिवर्तन या विषयांवर विचार मांडले. दक्षिण विधानसभा बी.आर.एस.पी. महासचिव यांनीदेखील आपले मत व्यक्त करून संघटन मजबूत करण्याचे आवाहन केले. नवीन पदाधिकार्‍यांनी बी.आर.एस.पी. चळवळ ही शाहू-फुले-आंबेडकरी विचारसरणीवर आधारित असून ती सामाजिक परिवर्तनातून राजकीय परिवर्तन घडवून आणण्याचे उद्दिष्ट ठेवते, असे सांगितले.

### अंगणवाडी केंद्रात डॉ. बाबासाहेबांचा शाळा प्रवेश दिन साजरा




**नागपूर :** बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, नागपूर शाखेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या शाळा प्रवेश दिनानिमित्त आंगणवाडी केंद्र क्रमांक 17, 18 आणि 19, वनदेवी नगर, विटा भट्टी चौक, नागपूर येथे राजेश (बौद्ध) दहिवले यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला उपाध्यक्ष नरेंद्र चहांदे, सचिव आकाश चौरे, सहसचिव अशोक रामटेके तसेच समता सैनिक दलाचे अनिल वाघमारे प्रमुख उपस्थित होते. या प्रसंगी अतिथींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिनाचे महत्त्व अधोरेखित करत बौद्ध संस्था, संघटना आणि विहार प्रतिनिधींनी व्यापक प्रमाणात कार्यक्रम आयोजित करावेत, असे आवाहन केले. अंगणवाडी केंद्रातील 60 विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वितरण करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 7 नोव्हेंबर 1900 रोजी सातारा येथील श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला होता. महाराष्ट्र शासनाने त्या दिवसाला विद्यार्थी दिवस म्हणून घोषित केल्याचे नमूद करण्यात आले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आंगणवाडी सेविका दीपाली चौरे, शालिनी मानवटकर, प्रीती पाटील आणि सहाय्यक कर्मचार्‍यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे वृत्त संस्थेचे जिल्हा मीडिया समन्वयक डी.डी. गजभिये यांनी 'दैनिक बहुजन सौरभ'ला कळविले. या वेळी पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## लग्न जुळण्यासाठी आता सूचक संस्था व परिचय संमेलने हा उत्तम पर्याय



**संवादमित्र रविराजे उपाध्ये, नागपूर :** आजच्या प्रतिस्पर्धा आणि धकाधकीच्या काळात मुला-मुलींचे लग्न जमवण्यात मातापित्यांची दमछाक होत आहे. अशावेळी वधु-वर सूचक मंडळांचे संचालक तसेच वधु-वर संमेलनांचे आयोजक यांच्यावरील जबाबदारी दिवसेंदिवस वाढत चालली आहे, असे एकंदरित चित्र आहे. पुर्वी कोणत्याही विवाह नोंदणी संस्था अस्तित्वात नव्हत्या. पण नात्या-गोत्यांममधील वीण घट्ट होती. आप्तेष्ट व नातेवाईकांच्या माध्यमातून लग्न जुळून येत असत. गावाकडच्या पारावर गप्पा मारत विवाह जुळणी केली जात असे. आता विभक्त कुटुंबांची संख्या वाढली आहे तसेच बदलत्या काळानुरूप आताच्या परिस्थितीत वधु-वरांच्या अपेक्षा वाढत चाललेल्या दिसत आहेत. अशा परिस्थितीत आपल्या विवाहयोग्य पाल्याचे शुभमंगल करण्यासाठी पालकांकडून वधु-वर शोधक मंडळे व वधु-वर परिचय संमेलनांचा आधार घेण्यात येत आहे. या विषयामध्ये बरेच वर्षांपासून कार्य करीत असलेले नालंदा मंगलमैत्री संस्थेचे संचालक प्रशांत सहारे यांनी सांगीतले की आम्ही आमच्या परीने शहरी आणि ग्रामीण ही दरी मिटविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहोत. आज बहुसंख्य विवाह-इच्छुकांचा कल हा आपापल्या जिल्ह्यातील स्थळांना प्राधान्य देण्याकडे आहे म्हणून आम्ही जिल्हानिहाय ग्रुप्स बनविले आहेत. परिचय पत्रामध्ये दिलेली माहिती अगदी खरी असावी, याकडे आमचा कटाक्ष असतो. संस्थेकडे नोंदणीकृत असलेले परिचय पत्र आम्ही जसेच्या तसे व त्यात काहीही बदल न करता अधिकाधिक ग्रुप वर पाठवत असतो. त्यामुळे त्यात दिलेल्या क्रमांकावर पुढील पक्ष प्रत्यक्ष बोलणी करू शकतो. यातून लग्न जुळून येत आहेत. बरेचशे संस्थाचालक हे वधु-वरांचा नंबर दडवून ठेवतात व संपर्क करून देण्याच्या निमित्ताने समाजाची आर्थिक लुबाडणूक करतात, या बद्दल त्यांनी आपला रोषही व्यक्त केला. बरेचदा पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या ठिकाणी बायोडाटा शेअर करुन ही अपेक्षांनुसार जोडीदार शोधण्यात यश मिळत नाही. बोगस वेबसाईटच्या माध्यमातून देखील अनेकांची फसवणूक झालेली आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण भारतीय बौद्ध धम्मीय नियोजित वधू-वर यांच्या करीता अगदी मोफत सेवा देत असलेल्या धम्ममेत्ता बुद्धिस्ट मॅट्रोमोनी सारख्या वेबसाईट वर नोंदणी पुर्ण करुन शोधाची वेळ व आर्थिक बचत करुन देण्याचे कार्य केले जात आहे. वधु-वरांना एकमेकांचा प्रत्यक्ष परिचय करून देण्यासाठी सामाजिक संमेलने आयोजित होत असतात. आपली शोध मोहीम कमीत कमी वेळात व कमीत कमी खर्चात सफल व्हावी म्हणून हा पर्याय देखील उत्तम मानला पाहिजे म्हणून इच्छुक मुला-मुलींनी अशा कार्यक्रमांचा अवश्य लाभ घेतला पाहिजे, असेही मत प्रशांत सहारे यांनी नोंदविले.

## डॉ. किशोर इंगळे यांची चित्रकला महाविद्यालयाला भेट



**नागपूर :** शासकीय रेखाकला एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षा मूल्यमापन केंद्र, शासकीय चित्रकला महाविद्यालय, लक्ष्मीनगर, नागपूर येथे महाराष्ट्र राज्याचे कलासंचालक डॉ. किशोर इंगळे यांनी सदिच्छा भेट दिली. या भेटीच्या वेळी कलानिरीक्षक डोंगरे तसेच शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालयाचे अधिष्ठाता विश्वनाथ साबळे उपस्थित होते. तसेच उपमुख्य समालोचक सोनटक्के, मॉडरेटर समरीत, मॉडरेटर बन्सोड, मॉडरेटर रामेश्वर वकेकार आणि मॉडरेटर लक्ष्मी मेहर उपस्थित होते. नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपुर व गोंदिया या जिल्ह्यांतील परीक्षक या प्रसंगी उपस्थित होते.

डॉ. इंगळे यांच्या स्वागतासाठी सोनटक्के यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व रोपटे देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. बैठकीदरम्यान परीक्षा मूल्यमापन केंद्रांशी संबंधित विविध प्रश्न, अडचणी व सूचना समरीत यांनी कलासंचालकांसमोर मांडल्या. या समस्यांकडे डॉ. इंगळे यांनी गांभीर्याने लक्ष देत, सर्व प्रश्नांचे त्वरित निराकरण करण्यात येईल, असे आश्वासन दिले. कलासंचालक डॉ. इंगळे हे स्वतः कलेचे उपासक व संवेदनशील प्रशासक असल्याने कला शिक्षकांमध्ये विशेष उत्साह आणि आत्मविश्वास निर्माण झाला आहे. त्यांच्या या भेटीमुळे राज्यातील कला शिक्षक, परीक्षक व विद्यार्थीवर्ग यांच्यात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली, परीक्षा प्रक्रियेत अधिक पारदर्शकता कार्यक्षमता येईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## 15 व 16 नोव्हेंबरला गडचिरोली येथे आदिवासी जनचेतना महासंमेलन




**गडचिरोली :** जननायक बिरसा मुंडा यांच्या दीडशे व्या जयंती महोत्सवानिमित्त आणि भारतीय संविधान अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी (बीआरएसपी), भारतीय आदिवासी परिषद आणि आदिवासी-दलित एकता परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी जनचेतना महासंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हा दोन दिवसीय कार्यक्रम येत्या 15 व 16 नोव्हेंबर रोजी राजीव गांधी सभागृह, इंदिरा गांधी चौक, गडचिरोली येथे सकाळी 9 वाजता सुरू होईल. कार्यक्रमाचे उद्घाटन बीआरएसपीचे संस्थापक अध्यक्ष ॲड. डॉ. सुरेश माने यांच्या शुभहस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या प्रारंभी बिरसा मुंडा, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात येईल. मुख्य अतिथी म्हणून संभाजी सरकुंडे, इ.झेड. खोब्रागडे आणि खासदार उमेश पटेल उपस्थित राहणार आहेत. तसेच विशेष अतिथी म्हणून लोकेंद्र सिंग, भारतीय आदिवासी परिषदेचे अध्यक्ष लटारी मडावी व रोहिदास राऊत सहभागी होतील. दुपारी जाहीर चर्चासत्राचे आयोजन करण्यात येणार असून, दुसर्‍या दिवशी म्हणजेच 16 नोव्हेंबर रोजी 'आदिवासी-दलित संघर्ष, राजकारण व भवितव्य' या विषयावर विशेष चर्चासत्र होणार आहे. या प्रसंगी ॲड. डॉ. सुरेश माने यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, बीआरएसपी नगरपरिषद, नगरपंचायत आणि नगरपालिका निवडणुका समविचारी पक्षांसोबत लढविणार आहे. कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने आदिवासी समाजबंधूंनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या संमेलनात अनेक आदिवासी विचारवंत, विषयतज्ञ आणि अनुभवी कार्यकर्ते मार्गदर्शन करणार आहेत. पत्रपरिषदेच्या वेळी ॲड. डॉ. सुरेश माने, ॲड. भीमराव शेंडे व समन्वयक डॉ. विनोद रंगारी उपस्थित होते.

## महावितरण व तांत्रिक ॲप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशनचा पुढाकार

### 51 रक्तदाताने केले रक्तदान

**नरखेड :** महावितरण व तांत्रिक कामगार युनियन प्रणित तांत्रिक ॲप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशनच्या वतीने दि. 06 नोव्हेंबर रोजी रक्तदान शिबीर, इ एस आय सी नोंदणी अभियान, हेल्थ कॅम्प शिबिर व कामगार मेळावा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमांचे उद्घाटक नागपूर ग्रामीण मंडळाचे अधिक्षक अभियंता संजय वाकडे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी तांत्रिक कामगार युनियनचे सरचिटणीस प्रभाकर लहाने उपस्थितीत होते. प्रमुख अतिथी म्हणून महेश जाधव (सहाय्यक महाव्यवस्थापक) प्रकाश निकम (राज्य सचिव), पवन नंदरधने (उपकार्यकारी अभियंता), डॉ. अनुप अग्रवाल (वॉकडार्ट सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल), संजय बारागवने (आयुष ब्लड सेंटर) सौरभ अवसरमोल, निलेश मेश्राम, संजय भागवत, रोहित मेश्राम, सौरभ नैताम, शुभम हेडाऊ, रितेश रामटेके प्रमुख उपस्थित होते. यावेळी उद्घाटकी



मनोगत व्यक्त करतांना अधिक्षक अभियंता संजय वाकडे यांनी महावितरण मधील महत्वाचा घटक तांत्रिक कामगार व कंत्राटी कामगार हाच खरा मानबिंदू आहे. त्याची सुरक्षा, त्यांचे प्रलंबित असलेले प्रश्न यासाठी प्रशासन सकारात्मक काम करेल तसेच तांत्रिक कामगारांनी अपघात विरहित काम करावे. यावेळी महेश जाधव, प्रकाश निकम, संजय बारागवने मनोगत व्यक्त केले. यावेळी अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना तांत्रिक कामगार युनियनचे प्रभाकर लहाने यांनी तांत्रिक कामगार युनियनचे कार्य हे कंपनीच्या व तांत्रिक कामगारांच्या हिताकरता आहे. कार्यक्रमाचे संचालन प्रकाश निकम यांनी केले व आभार नितेश घुसे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी योगेश धांडे, कुणाल जिचकार, मंगेश चिमोटे, निलेश चक्रपाणी, गणेश बडगे, सुनिल खडसकर, शुभम पंचभाई, माधव चकोर, आकाश गुप्ता, पवन सौदागर, रवि सरोदे, शुभम भोयर, अमोल कावळे, सुरज ढोके, सुधाकर काकडे, पराग रेवतकर आदीने प्रयत्न केले.

## वर्‍हाडी माय बोली कार्यक्रमात लोटपोट ...

### स्पेशल वर्‍हाडी कविता व किस्से यांचा दिवाकर देशमुख व किशोर मुगल यांचा विनोदी कार्यक्रम...

**नागपूर :** कला गौरव संस्था नागपुरच्या विद्यमाने दरवर्षी वाढोणा येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात कार्तिक महोत्सव साजरा करण्यात येतो, विविध कार्यक्रमाची सप्ताहभर अगदी रेलचेल असते. दिंडी, रिंगण, पालखी सोहळा, महापूजा व महाप्रसादाने कार्तिक महोत्सवाची सांगता होते. कार्यक्रमाचे उदघाटन अक्षरक्रांती फाऊंडेशनचे अध्यक्ष शंकर घोरसे यांनी केले तर प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून महात्मा फुले शिक्षण संस्थेचे कार्यकारी संचालक देवेंद्र काटे मंचावर उपस्थित होते. या दैनंदिन ताणतणावाच्या जीवनात व दिवसेंदिवस वाढत चाललेल्या महागाईमुळे ग्रामीण व शहरी भागातील सर्वांच्या ओठावरचे हसूच नाहीसे झाले आहे. म्हणून वर्‍हाडी माय बोली हा स्पेशल वर्‍हाडी कविता व किस्से यांचा दिवाकर देशमुख व किशोर मुगल यांचा विनोदी कार्यक्रम आयोजित केला होता. त्यांनी सलग दोन तास लोकांना आपल्या वर्‍हाडी कविता व किस्से यांनी अगदी खुर्चीला खिळवून ठेवत लोटपोट हसविलं आहे. तर कधी वर्तमान सामाजिक प्रश्नावर भाष्य करणारी मार्मिक कविता ऐकवून लोकांच्या डोळ्यात अश्रू सुद्धा तरळले होते.

किशोर मुगल आपल्या कवितेतून म्हणाले...

*तीन तीन लेकरं, पण एक नाही कामाचं*



*म्हातारपण चाललं हाय,नाव घेत रामाचं*

शिक्षण व नोकरीसाठी जन्मगांव सोडून शहरात गेलेली मुले तिकडेच कायमस्वरूपी रामतात आणि म्हातारपणी आई वडिलांची काठी होण्या ऐवजी त्यांनाच निराधार करून जगतात. कविता ऐकताना अनेकांच्या डोळ्यात अश्रू तरळले होते.

शेवटी शेतकर्‍याला धिर देत म्हणाले

*नको नको रे शेतकर्‍या, नको आत्महत्या करू*
*पाखराले असा वार्‍यावर सोडु*
*तुच नाही पिकविल, काय लेकरं खाईन*
*रानातल्या पाखरांलै दाना कोन भरविन*
*तुच जगाचा पोशिंदा, तुझी महती रे थोर*
*गळफास लाऊनीया उघडी पडतीरे पोरं*

तर अनेक विनोदी वर्‍हाडी कवितानी लोटपोट हसवून लोकांना मंत्रमुग्ध केले होते. हा कार्यक्रम संपूच नये असे अनेकांना वाटत होते. प्रसंगी कार्यक्रमाच्या सुरुवातीला एक भावनिक व गावाशी ऋणानुबंध जपणारा माहेरवाशीण हा कार्यक्रम आयोजित केला होता. गावातून विवाहानंतर सासुरवाडीला गेलेल्या तेथील सर्व महिला दिवाळी ऐवजी गावच्या कार्तिक महोत्सवाला माहेरी येतात. अनेकांच्या कुटुंबातील कौटुंबिक कलहामुळे मुलीचं माहेर तुटतात तर कुणाचे आईवडील हयात नसल्याने त्या माहेराला पोरक्या होतात अश्या शेकडो महिलांना शोधून काढत त्यांना एकत्रित कार्तिक महोत्सव निमित्त एकत्रित आमंत्रित करून त्यांना साडीचोळी देऊन माहेर जिवंत असल्याची भावनिक जाणीव कला गौरव संस्थेने करून दिली आहे. त्यांच्या दुःखावर फुंकर घालण्यासाठीच हा वर्‍हाडी मायबोली विनोदी वर्‍हाडी कविता व किस्याचा कार्यक्रम आयोजित केला असल्याचे संस्थेच्या अध्यक्ष डॉ. संगीता बानाईत व सचिव भागवत बानाईत यांनी सांगितले आहे.


# PROPERTY FOR SALE

Prime Land with Construction for Sale

**Wela (Hari), Shankarpur Road, Nagpur (Gramin)**

Perfect for Educational Institutions:

Area 0.46 hectares (50,000 Sq. Ft) with construction around 35000 Sq. Ft., Ideal for Schools, College, Training Center, Residential Tution College, Hotel, Hostel, Ambusman Park




**Contact : Sulay 9860361121**



बहुजन सौरभ

## इथे संपर्क साधावा

- **प्रवीण गायकवाड** 09850301528 विश्वकर्मा नगर, कुकडे लाऊड, वंजारीनगर, एम्प्रेस मिल कॉलनी
- **निलेश कांबळे** मो नं. 94236 34976 **एरिया :** उंटखाना, दत्तात्रयनगर, सुभेदार ले आउट , म्हाळगीनगर
- **सुनील कुंभारे** मो नं. 98238 94329
- **विशाखा नारायणे** मो नं 99602 41648 **एरिया :** जोगी नगर , काशी नगर, धाडीवाल ले आऊट, सुयोग नगर, रानवाडी
- **प्रमोद चहांदे** मो नं 9273170800 जोगी नगर, धाडीवाल ले आऊट, संयोग नगर, नरेंद्र नगर,
- **चंदू नगरारे** मो नं. 9975968852 शताब्दी नगर, काशी नगर, अभयनगर, जयवंतनगर, भीम नगर, जोगी नगर.
- **निलेश वालदे** मो.नं.9764772886 मोहन नगर. गौतम नगर, गड्डीगोदाम परिसर
- **मसारकर** 918080158604 धाडीवाल ले आउट.
- **लिना विनोद भोवते** मो.नं. 9021770694 इंदोरा, जरीपटका, भीमचौक, नाराघाट.
- **प्रविण राजाराम ठवरे** मो.नं. 9372331798 मॉडेल टॉऊन, बेझनबाग.
- **रितेश अनिल बोदेले** मो.नं. 9511843694 WCL पॉव ग्रीड
- **गगन प्रताप नाहारकर** मो.नं. 8793389936 मेकोसाबाग, नवा नकाशा.
- **प्रमोद बागडे** मो.नं. 9764973627 इंदोरा, सुगत नगर.
- **बी प्रकाश राव** मो.नं. 9022621075 भीमचौक, बेझनबाग, मेकोसाबाग.
- **पुष्पीत कराडे** मो.नं. 8055416108 वैशाली नगर, राणी दुर्गावती चौक.
- **राहुल राजकुमार जांबुळकर** मो.नं. 9673392025 नारी.
- **श्रीकांत वासनिक** मो.नं. 9767624345 काचीपूरा, बाबूळखेडा, पार्वती नगर, रमा नगर, जय भिम नगर.
- **मंगेश शंभरकर** मो.नं. 9970258703 नरेंद्र नगर, सुयोग नगर, भिम नगर, शताब्दी नगर.
- **निळकंठ वि. जवादे** मो.नं. 9623773365 रमा नगर, मनीष नगर.
- **विनोद कृष्णराव डूले** वेदांगा न्यूजपेपर, झिंगाबाई टाकळी, गोधनी रोड, . 7447767922
- **आशिष थुल** 9423400956 धरमपेठ, आंबेडकरनगर
- **राम मानवटकर** 8626037360, न्यू. मनिष नगर
- **अमन शरणागत** 9575673895 टेकअप सिटी , दिघोरी, बहादूरा पेपर एजन्सी,
- **राहुल आठवले** 8485854398 संबोधी बुद्ध विहार, गिट्टीखदान, काटोल रोड, नागपूर
- **दिगाबर पांडुरंग वासनिक** 9561974131 454- नविन सुभेदार ले आऊट दिनेश पेपर एजन्सी





बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. **RNI No. MAHMAR 2020/84035** Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648